म. ग्रं. सं. ठाणे
विषय भाषा व्याकरण
सं. क्र. १५१८

९८२५

REFBK-0002885

म. ग्रं. सं. ठाणे
विषय भाषा व्याकरण
नं. ५९.

# मराठी साहित्य.

ग्रंथ संग्रहालय
नं.
नं.
ठाणे.

१४

REFBK-0002885
REFBK-0002885

श्री सयाजी साहित्यमाला.

श्रीसयाजी साहित्यमाळा पुष्प ९४ वें.

( प्रकीर्ण गुच्छ. )

# वडोद्याचें मराठी साहित्य.

लेखक आणि प्रकाशक

गणेश रंगनाथ दंडवते

प्रगति, महाराष्ट्रनियतकालिक दीपिका, अर्वाचीन मराठी वाङ्मय
इत्यादि पुस्तकांचे कर्ते.

बडोदें.

१९२५

नं. ३३७
ता. ६
२८८५

हें पुस्तक बडोदें येथें जुन्या मोदीखान्याजवळ श्री आर्य सुधारक छाप-
खान्यांत रा. मणीभाई मथुरभाई गुप्त यांनीं प्रकाशकाकरितां छापिलें.
तारीख १३-१-२५.

किंमत ०-११-० आणे.

श्री ग्रंथ संग्रहालय
नं.
आ.
ता.

# प्रस्तावना.

येथील ' सहविचार ' त्रैमासिकाच्या ऑगस्ट सन १९२३ च्या अंकांत ग्वाल्हेरचे श्रीयुत भास्कर रामचंद्र भालेराव यांनीं काढलेला ' उत्तर हिंदुस्थानांतील मराठी साहित्य व साहित्यभक्त ' यांचा उत्कृष्ट आढावा अवलोकिल्यावर मराठी साहित्याचा अशा तऱ्हेचा खास बडोद्यापुरता आढावा काढण्याचें मनांत येऊन त्या दिशेनें केलेल्या प्रयत्नाचें हें दृश्यफल श्रीमंत महाराज साहेबांस आणि वाचक वर्गास सादर करतांना मला आनंद वाटत आहे.

येथील दहाव्या महाराष्ट्र साहित्य संमेलनासाठी काढलेला उपरिनिर्दिष्ट भालेरावांचा आढावा जसा लेखकाच्या लौकिकास तसाच त्याने आपल्या लेखास दिलेल्या अनुरूप नांवास साजेसा झाला असून महाराष्ट्र वाङ्मयेतिहासाच्या अभ्यासकांस तो फार महत्त्वाचा वाटेल यांत संशय नाहीं. रा. भालेरावांची ही कामगिरी प्रसंशनीय नाहीं असें कोण ह्मणेल? व त्यांनीं आपल्या लेखास आतां पुस्तकाचें स्वरूप देऊन तो चिरस्थायीं करावा असें कोणास वाटणार नाहीं?

प्रस्तुतचा आमचा प्रयत्न रा. भालेरावांच्या प्रयत्नाइतका व्यापक स्वरूपाचा नाहीं. म्हणजे भालेरावांनीं जसा उत्तर हिंदुस्थानांतील एकूण एक शहरांच्या प्राचीन व अर्वाचीन मराठी वाङ्मय निष्पत्तीचा आढावा काढला आहे, तसें आम्हांस करावयाचें नाहीं. प्रस्तुत प्रसंगीं आम्हीं मराठी साहित्याभिवृद्धी संबंधानें फक्त बडोद्यानें काय केलें आहे एवढेंच पाहणार आहों, आणि असें करण्याची संधी आणून दिल्याबद्दल व श्रीसयाजीसाहित्य मालेंतील एका पुष्पाचा मान देऊन माझ्या या अल्प प्रयत्नास गौरविल्याबद्दल मे. विद्याधिकारी साहेबांचे आभार मानून हे प्रास्ताविक दोन शब्द येथेंच पुरे करतों.

गणेश रंगनाथ दंडवते.

श्री.

# जाहिरात.

आपल्या देशी भाषांच्या साहित्याची अभिवृद्धि करण्याच्या सद्धेतूनें श्रीमंत महाराज साहेब श्री सयाजीराव गायकवाड, सेनाखासखेल समशेर बहादूर, जी. सी. एस्. आय्., जी. सी. आय्. ई., ह्यांनीं कृपावंत होऊन दोन लक्ष रुपयांची जी रक्कम अनामत ठेविली आहे, तिच्या व्याजांतून " **श्रीसयाजी-साहित्यमालेंत** " विविध विषयांवर पुस्तकें तयार करण्यांत येत असतात.

" बडोद्याचें मराठी साहित्व " हें स्वतंत्र पुस्तक असून तें रा. रा. गणेश रंगनाथ दंडवते, लायब्रेरियन, सेंट्रल लायब्ररी, बडोदें, ह्यांचेकडून लिहवून उक्त मालेंतील प्रकीर्ण गुच्छांत चौऱ्याण्णवावें पुष्प ह्मणून प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

भाषांतरशाखा,

विद्याधिकारी कचेरी
बडोदें, ता. १३ जाने-
वारी सन १९२५.

ज. पु. जोशीपुरा.
भा. म.

नं. के दीक्षित.
विद्याधिकारी.
बडोदें राज्य.

२८८५.

# बडोद्याचें मराठीसाहित्य व साहित्यभक्त.

ग्रंथ संग्रहालय २८८५ २०७५

बडोदे येथील मराठी साहित्याच्या व साहित्यभक्तांच्या विवेचनास आरंभ करण्यापूर्वी पहिल्यानें मराठ्यांची छाप या देशावर केव्हां पडली आणि मराठे या देशाशी केव्हांपासून परिचित आहेत हें पाहणें अवश्य आहे.

**विषय प्रवेश.**

" राज्यक्रांतीच्या वेळीं म्हणजे ज्या वेळीं देशांत सर्वसाधारण जबर फेरफार होत असतात, त्या वेळीं प्रत्येक मनुष्य आपल्या स्वतःच्याच फायद्यापुरती लढाई करीत असतो. अशा वेळीं बलवान व कर्तृत्ववान मनुष्य फार सरसावतो. इ. स. च्या आठराच्या शतकांत ज्यावेळीं इंग्रेज व्यापारी आपला व्यापारीपणा बाजूस ठेवून देश जिंकीत चालले होते; त्या वेळीं ज्यांचा गत इतिहास अगदीं त्रोटक व ज्यांचें राजकीय ऐक्य अगदीं संपुष्टांत आलें होतें अशा मराठ्यांचाही तारा कोठें कोठें झळकत असे. त्यांच्यांत सर्वांत सामर्थ्यवान व अतीशय धाडशी लोक होते, ते मूळचे कितीही क्षुद्र असले तरी, लवकरच पुढें आले. अशी मंडळी बाळाजी विश्वनाथ, मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे, उदाजी

[illegible], कंताजी कदम व पिलाजी गायकवाड हे होत. गायकवा-[illegible] पुणें शहराजवळील आपलें मूलस्थान दावडी खेडें पुष्कळ [illegible]पासून सोडलें होतें व ते सेनापति दाभाडे यांच्या बरोबर असत. [illegible] पिलाजीस प्रथम चळीसपन्नास घोडयांची पागा देऊन त्यास [illegible]पुर येथें ठेविलें होतें. परंतु आपली धमक व शहाणपणा [illegible] जोरावर तो सुरतेच्या यशस्वी लुटीनंतर दोनतीनशें घोडयां-[illegible] नायकीवरून पागेच्या नायकीला चढला. पुढें पवार जेंव्हां [illegible]पूर हें आपल्या ताब्यांतलें असें प्रतिपादूं लागला तेंव्हां पिला-[illegible] नवापूर सोडून जाणें भाग पडलें. म्हणून त्यानें ज्या ठिकाणीं [illegible]प्याचा प्रवेश होणें कठीण अशा जंगलांतील एक टेकडी शोधून [illegible]. ही पूर्वी मेवासी भिल्लांच्या ताब्यांत होती. या टेकडीवर [illegible]जीनें सोनगढ किल्ला बांधला. हेंच गायकवाडांच्या घराण्याचें [illegible] घर होय व पुष्कळ वर्षे म्हणजे इ. स. १७६६ पर्यंत त्यांच्या [illegible]ची राजधानी सोनगड येथेंच होती."

"सेनापतीची सर्व साधनें पिलाजी गायकवाडाच्या ताब्यांत [illegible]. सोनगढ, बडोदें व डभोइ या शहराचा तो अधिपति होता. [illegible] व कोळी लोकांचा साह्यकारी आणि जमीनदारांचा मित्र [illegible] पुढें स. १७३२ त पिलाजी डाकोर येथें तंबू देऊन [illegible] असतां जोधपूरच्या अभयसिंहानें एका मारवाडयाकडून [illegible]च त्याचा खून करविला व बडोदें शहर हस्तगत करून तें [illegible] शेरखान बेबी याच्या स्वाधीन केलें. परंतु पुढें सन १७३३

त पिलाजीचा मुलगा दमाजी गायकवाड यानें संताजी कदमाच्या मदतीनें अमदाबादावर हल्ला केला व सन १७३४ त शेरखान बेबीपासून बडोदें शहर पुन्हां हस्तगत करून घेतलें. त्या वेळेपासून आज तागायत बडोदें गायकवाडांच्याच ताब्यांत आहे " ×

" सन १७६८ त दमाजी गायकवाड मरण पावल्यानंतर त्याचा वडील मुलगा गोविंदराव यास बडोद्याची गादी ताबडतोब मिळाली नाहीं. तिच्या प्राप्तीकरितां त्यांनां जवळ जवळ पंचवीस वर्षें देशांतर, वनवास, अज्ञातवास, दैन्यावस्था व गृहकलह वगैरे गोष्टीपासून अतोनात त्रास सोसावा लागून शेवटीं म्हणजे सन १७९३ सालीं त्यांनां पुणें दरबारांतून ' सेनाखासखेल ' चीं वस्त्रें व बडोद्याची गादी सरळपणें प्राप्त झाली. " *

म्हणजे मराठयांच्या गुजराथ देशाप्त झालेल्या पहिल्या पारिचयास सुमारें दोनशें वर्षें झालीं. या दोनशें वर्षांच्या मुदतीचे पहिलीं साठ वर्षें राज्यक्रांतीचीं, ऐंशीं वर्षे अंतस्थ कलहाचीं व अस्वस्थतेचीं आणि पुन्हां साठ वर्षें शांततेचीं, सुखसमाधानाचीं व भरभराटीचीं असे तीन विभाग पाडतां येतील. येथील मराठीवाङ्मयनिष्पत्तीस या पैकीं कोणत्या कालविभागांत आरंभ झाला असावा बरें ? बहुतेक दुसऱ्या विभागाचें शेवटीं. कारण खास

× बडोद्याचे राज्यकर्ते पृष्ट ३४, ३७ आणि ४८.

* श्री. थोरले सयाजीराव महाराज यांचें चरित्र, पृष्ट २

गुजराथकाठेवाडचें—मराठ्यांचा या देशाशीं परिचय होण्यापूर्वींचें—असें प्राचीन मराठी वाङ्मय नाहींच असें ह्मटलें असतां चालेल. आणि असेल तरी ते काळाच्या उदरांत गडप झालें असले पाहिजे. यामुळें आमची सारी भिस्त बडोद्यांत झालेल्या अर्वाचीन मराठी वाङ्मयनिष्पत्तीवरच आहे. आणि ही वाङ्मयनिष्पत्ति फार तर पाऊणशे वर्षांपलीकडे फारशी जात नाहीं. इतकेंच नव्हे तर येथील खऱ्या वाङ्मयनिष्पत्तीच्या वाट्यास अवघीं तीसच वर्षें आलीं आहेत.

कै. श्री. थोरल्या सयाजीराव महाराजांच्या, कै. श्री. गणपतराव महाराजांच्या, कै. श्री. खंडेराव महाराजांच्या अथवा कै. श्री. जमनाबाई साहेबांच्या कारकिर्दीचा लौकिक ज्या कारणांमुळें आहे त्यापेक्षां प्रस्तुतच्या श्रीमंत सयाजीराव महाराजांच्या कारकिर्दीच्या लौकिकाचें कारण निराळें आहे, हें कोणासही सांगावयास नको. प्रस्तुतच्या श्रीमंत सयाजीराव महाराजांच्या राज्यकारभाराचा इतिहास जसा बडोदें राज्याच्या दुसऱ्या अनेक सुधारणांचा महत्वाचा इतिहास समजला जातो, तसाच तो मराठी साहित्याभिवृध्दीसंबंधानें समजला जाणें अवश्य आहे. महाराजांच्या सुधारणाप्रियतेमुळें बडोदें राज्यास जसा इतर अनेक सुधारणांचा लाभ झाला त्याप्रमाणेंच त्यांच्या विद्याव्यासंगामुळें व त्यांच्या मातृभाषाप्रेमामुळें बडोदें राज्यांत मराठी साहित्याभिवृध्दीसही फार मोठी मदत झाली आहे हें कोणीही नाकबूल करणार नाहीं. असो.

वरील कालविभागणीवरून असें दिसून येतें कीं, महाराष्ट्र संस्कृतीचें बीजारोपण या देशांत पहिल्या राज्यक्रांतीच्या कालानें केलें, दुसऱ्या कालांत त्याचें बऱ्याबाइटानें जतन झालें आणि तिसऱ्या कालविभागांत त्याची वाढ व जोपासना झाली. अर्थात तिसऱ्या जोपासनेच्या कालविभागांतच महाराष्ट्र वाङ्मयनिष्पत्तीस प्रारंभ होणें क्रमप्राप्य आहे.

या कालास कै. श्रीमंत गणपतराव महाराजांच्या कारकिर्दीपासून सुरु करणें सोयीचें होईल आणि तें तसेंच केलेंही पाहिजे.

असें करण्यास आह्मांस प्रत्यक्ष श्रीमंताचाच आधार आहे. श्रीमंतांनीं पहिल्यानें येथें स्थापन झालेल्या ‘ ग्रंथसंपादक आणि प्रसारक ’ मंडळीच्या पहिल्या पंचवार्षिक समारंभाचें वेळीं केलेल्या भाषणांत “ या राज्यांत कै. श्री. गणपतराव महाराजांच्य कारकिर्दींत या मुद्रणकलेस सुरुवात झाली ” असें म्हटलें आहे. इतर प्रमाणेंही या गोष्टीस बळकटी आणतात आणि साहित्याची मुहुर्तमेढ रोंवण्याचे श्रेय याच राजपुत्राकडे येतें. “ यांनीं ( कै. गणपतराव महाराजांनीं ) कर्नल फ्रेंच व कॅप्टन हार्ट या दोन युरोपियन गृहस्थांच्या नेतृत्वाखाली मुंबई येथें स्थापन झालेल्या ‘ दक्षिण भाषेंत पुस्तकें प्रसिद्ध करणारी मंडळी ’ या संस्थेस सन १८४९ सालीं पांच हजार रुपये बक्षिस दिलें.+” ग्रंथोत्तेजनासारख्या कार्यास मदत करणें ही गोष्ट त्या वेळेपावेतों गायक-

+ विविधज्ञानविस्तार, मार्च, सन १८७८

वाडी घराण्यांत केवळ अपूर्व ह्मणूनच वाखाणण्यासारखी आहे. कारण " ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं दमाजीच्या वेळेपासून कोणताही गायकवाड पुण्यास जाण्याशिवाय आपल्या मुलखाचे बाहेर पडला नाहीं. ते आपल्या लहानशा संस्थानांतच नेहमीं गुरफटलेले असल्यामुळें संकोचित बुद्धीचे असत. आपल्या राज्याच्या पलीकडे कांहीं जग आहे अशी गायकवाडास कल्पनाच नसे. या समयीं (श्री. गणपतराव) महाराजांस आपण कांहीं पुस्तकें वाचण्यास कसें लाविलें, लंडन शहर कलकत्त्याचें दक्षिणेस कोठें तरी आहे ही त्यांची समजूत कशी घालविली, आगगाडीच्या इन्जिनचें एक मोठें खेळणें त्यांचे कडून विकत कसें घेवविलें वगैरे गोष्टी त्या वेळचा ॲक्टिंग रेसिडेंट कॅप्टन फ्रेंच यांनीं लिहून ठेवल्या आहेत. "* असो.

कोठेंहीं काय; वाङ्मयाचा उगम पद्यापासून होतो आणि वाङ्मयाचे आद्यप्रणेतेही कवि, भाट व चारण हेच असतात. या स्थूल नियमास अनुसरून येथेंही प्रारंभीं पद्यांत ग्रंथरचना होणें सुरू झालें होतें. अशा साहित्यभक्तांत येथील या काळच्या कवी पैकीं विनायक महादेव नातू, अनंतसुत विठ्ठल व ' ललितानंद हे तीन कवि प्रमुख आहेत. ललितानंदास फत्तेसिंह गायकवाड यांचा चांगला

---

* बडोद्याचे राज्यकर्ते पृष्ट २७६

आश्रय असावा असें दिसते. या कवीचें 'सौंदर्य लहरी' हें टीका काव्य महाराष्ट्र काव्यग्रंथमालेंत प्रसिद्ध झालें असून तें बडोद्याच्या प्राचीन मराठी साहित्याचें शिरोभागीं शोभण्यासारखें आहे.

उदाहरणार्थ:—याच्या सौंदर्यलहरींतील पुढील कविता पहा.

नमुनि सद्गुरु देव गजानना ।
हृदयिं चिंतुनिया नगजानना ॥
'लहरि सुंदर' नामक हे टिका ।
कथिन शंकर उक्ति मऱ्हाटिका ॥

## श्लोक.

ज्याचा कीं डमरूनिनाद जनितें व्याकर्णसूत्रें भलीं
शेषांलागिं चतुर्दश प्रियकरें शंभू कृपें लाभलीं
त्याचा जो अवतार शंकर गुरु प्रख्यात भूमंडळीं
तद्वक्त्राब्जगिरादुरंत विदुषां तज्ज्ञान आखंडली
नाना शास्त्रकलाकलापकुशलां व्याकर्णे नैय्यायिकां
दुर्गम्यार्थ रहस्य हें स्फुट नसे वेदांत मीमांसकां;
ज्योतिः शास्त्रविदांसि लेश न कळे, कोणासही ना कळे
हें तो आगमगुह्य बालक म्हणे मातें कसें पैं कळे !
'नाविष्णुः पृथिवीपतिः' शुभमति हे बोलती भारती
ज्याची पुण्यगती अलौकिकरिती विख्यात या भारती
**श्रीमद्गायकवाड वंश** वसती या गुर्जरी शाश्वती
आज्ञाशक्तिवर्ती ममकृति **फत्तेसिंहाख्य राजन्वती**
आतां वंदुनि संत, सज्जन, महाश्रोते, द्विजांपंडितां
प्रार्थी बालक बोबडें शुभमती वाणी नसो खंडिता

द्यावें हो अभयाशिषा शुभमने संपूर्णटीका घडे;
वाग्देवी वदनांबुजीं वसुनिया गूढार्थ हा सांपडे
गीर्वाण पद्यरचना सहजें निगूढा
ते प्राकृतें समपदीं न घडेचि रूढा
त्या माजिशंकर गिरा गहना विशेषीं
यालागि दोष न दिजे पद अर्थशेषीं

या काव्याच्या उपसंहारात्म कविता सात आहेत. त्यांतील दोन पढील प्रमाणे आहेत:—

श्रीदत्ताख्य परंपरा गुरुकुळीं आनंद नाथावली
नित्यानंद पदानुरक्त विमळा नंद्याख्ययाभूतळीं
तत्पादाब्ज षडंघ्रिचित्त ललितानंदाननें सुंदरीं
बोले प्राकृत हे टिका स्विकरणें राहूनि हृत्कंदरी

अनंतसुत विठ्ठल याचा ' दत्तप्रबोध ' नामक दत्तचरित्रावर एक मोठा ग्रंथ आहे. त्याचे अध्याय ६१, व ओवीसंख्या १४२३६ आहे. या कवीचा प्राचीन मराठी कवितेशीं चांगला परिचय होता असें दिसतें. विनायक महादेव नातू हे कवीही सुमारें ७५ वर्षापूर्वी बडोदें येथें होऊन गेले. चित्पावन ब्राह्मण जातींत जे थोडेसे जुने कवि झाले त्यापैकीं हे एक होत. या कवीनें शके १७७० या वर्षी ' गणेश प्रताप ' नामक ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ गणेशपुराणाच्या आधारें लिहिला असून, त्याची २ खंडें, ५४ अध्याय व ५६६५ ओव्या आहेत. हा ग्रंथ छापून प्रसिद्ध झाला आहे. *

* महाराष्ट्र कविचरित्र भाग २

तथापि, या वेळच्या वाङ्मयाची आणखी एक बाजू आहे. ही बाजू ह्मणजे लावणी व पोवाडयाची. आणि करमणूकीच्या दुसऱ्या साधनांच्या अभावीं या वेळीं या साहित्याची भरभराट असणें स्वाभाविक आहे. आणि ह्मणूनच " वीरक्षेत्री† छंद करी कवि नूतन रचना खरी। पुण्य पदांचें महाराजांचें अशिर्वाद आहे शिरीं ॥ आलो पाहुणें आह्मीं मुशाफर ऐकुनि कीर्ती बरी। चार दिवस करुं वास खास भंरवसा असला तरी " ॥ असें म्हणणारे अनेक शाहिर त्या वेळीं बडोद्यांत होते व बडोद्यास येत असत. अशा शाहिरापैकीं अनंतफंदी, होनाजी बाळ व सगनभाऊ हे सुप्रसिद्ध आहेत. अनंतफंदीस श्री. फत्तेसिंह गायकवाड यांचा चांगला आश्रय होता. व अनंतफंदीचे चिरंजीव सवाईफंदी यांनींही गायकवाडींत ५०० रुपायांचें वर्षासन मिळविलें होतें. फंदींनीं पेशवाई व गायकवाडी आणि पुणें व बडोदें यांची पुढील फटक्यांत केलेली तुलना व वर्णन मार्मिक आहे.

## श्रीमंत फत्तेसिंह गायकवाडांचा पोवाडा.

पुण्यांत बाजीराव, बडोद्यांत फत्तेसिंह महाराज।
उदार स्वामी सेवक त्यांना कर्णाची उपमा साज ॥ धृ ॥

---

† श्री. सयाजीराव यांच्या वेळीं बडोद्यांत जादू, तंत्र, मंत्र, बीर देवीची वगैरे अनुष्ठानें, यांचें बंड फार होतें असें बडोद्याला जें 'वीरक्षेत्र' हे नांव पडलें आहे त्यावरून स्पष्ट व 'बीर बडोदें' होते. वीर बडोदें या नांवाबद्दल लोकांचा त्या वेळीं व आतांही तोच समज आहे.

( थो. सयाजीराव यांचें चरित्र, पृष्ठ ७७१ )

इकडे अमृतराय वडोल, तिकडेहि आनंदराय दादा ।
इकडे प्रभुबाजिराय, तिकडे फत्तेसिंह साहेब जादा ॥

इकडे आप्पा साहेब तिकडे महाराज सयाजी उमदा ।
इकडे पांच चार वाडे, तिकडेही तसाच महाल जुदा ॥

इकडे स्वामिचाकरीस पलटणें, तिकडे सेवक इंग्रज ।
उदार स्वामी सेवक त्यांनां कर्णाची उपमा साजे ॥ १ ॥

इकडे स्वार शिपाई, तिकडेहि तसेच थोडेबहुत ।
इकडे श्रावणमासि दक्षिणा, तिकडेही धर्म होत ॥

इकडे आल्यागेल्याचा आदर करितात यथास्थित श्रीमंत ।
तिकडेही जो आला गुणिजन तो नाहीं गेला रिक्तहस्त ॥
इकडे पेशवे, तिकडे गायकवाड उभयतांही शिरताज ।
उदार स्वामी सेवक० ॥ २ ॥

इकडे भरगची पांघरुणे, तिकडेही त्याहून चढी ।
इकडे अन्नशांतिचा तडाखा, तिकडेही चालू खिचडी ॥

इकडे आदितवार बुधवार तिकडेहीं मांडवींत घडामोडी ।
इकडे मुळामुठा, तिकडे विश्वामित्री जोडीं ॥
इकडे तळाव पर्वतीचा, तिकडे सुरसागर नांव गाजे ॥
उदार स्वामी सेवक त्यांना० ॥ ३ ॥

इकडे भूमिवर अंथरुण, तिकडे रेतिमुळें घरोघर खाटा
इकडे पैका पुष्कळ, तिकडेही सुवर्णाच्या लाटा ॥

इकडे जुनावाडा, तिकडेहीं लहरिपुऱ्याचा बोमाटा ।
इकडें पुरण वरण, तिकडे चुरमा, क्वचित् वरवंटा पाटा ।
इकडे पैठणी लफ्फे, तिकडे उशाजवळ अमदाबाद ॥
उदार स्वामी सेवक० ॥ ४ ॥

इकडे हत्ती घोडे पालख्या, तिकडेही कमती नाहीं ।
इकडे रावबाजी, तिकडे फत्तेसिंगानी दाहिदुराई ।
इकडे जोगेश्वरी, तिकडेही दैवत बेचराई ।
इकडे देवस्थानें, तिकडेही तशींच सांगूं काई
इकडे लोक दक्षिणी तिकडे गुजराथी न्यारि मिजाजं ॥
उदार स्वामी सेवक० ॥ ५ ॥

इकडे उत्साह गणपतिचा, तिकडे तशीच चंपाषष्ठी ।
इकडे हरदासांच्या बिदाग्या, तिकडे तशाच भरमुष्ठी ।
इकडे मेघडंबरी, तिकडे तशीच पहा जा दृष्टीं ।
इकडे ओंकारेश्वर, तिकडे मुक्तेश्वर नवीच सृष्टी ।
इकडे दिग्गच पहिलवान, तिकडे जेठी कुस्ती रोज ॥
उदार स्वामी सेवक० ॥ ६ ॥

इकडे नाना फडणिस, तिकडे सिताराम दिवाण गाजी ।
इकडे पंत सदाशिव तिकडे शास्त्री गंगाधर दाजी ।
इकडे बागमळे, तिकडे हरजिन्नस शाखभाजी ।
इकडे माती. तिकडे रेतीं हारफेर जमीनीमाजी ।
इकडे हौद पाण्याचे, तिकडे कुव्यावर मोठी मौज ॥
उदार स्वामी सेवक० ॥ ७ ॥

इकडे रावबाजी पंढरीस आषाढि यात्रे जातात ।
तिकडे विसां कोसांवर डाकुरजी पंढरिनाथ ।
इकडे गंगा जवळ, तिकडेही तसेंच रेवातीर्थ ।
इकडे तसेंच तिकडे वटाव दोन्हीकडला यथार्थ ।
इकडे कडेतोडेवाले, तिकडेही तशीच लहज ।
इकडे अनंतफंदी, तिकडेही जाउनि आला सहज ॥
उदार स्वामी सेवक त्यांना० ॥ ८ ॥

ग्रंथ संग्रहालय नं. २८५५ ठाणे

अनंतफंदींचे नातू फंदीबुवा यांनींही त्यांच्या वेळेपावेतों आपली परंपरा येथें ठेविली होती. हे सुमारें आठ दहा वर्षांपूर्वीं निवर्तले.

प्रभाकर कवीनें सयाजीराव महाराजावर पोवाडा केला असून यांत त्यानें बडोद्याचें वर्णन पुढीलप्रमाणें केलें आहे.

१ तो म्हणतो—

' अहारे बडोदें शहर कोट काम मजबूत । चार दरवाजे चार दिशे ज्यांवर शिपाई लालबूत । चोहों रस्त्यांवर दाट हवेल्या काप संगीन शाबूत । मांडवीत मोहरमांत जमती सर्व तिथें ताबूत । अजब शहर बसविले गिराशे करुन नस्त नाबूत । बाग, बगीचे, तलाव, साहेब घेती हवा तंबूत ॥ चाल । महा जागृत राजेश्वर पावती । संकटीं नीळकंठेश्वर धावती । भूत वाटेस यवतेश्वर लावती । बहुत उग्र नरसिंह समंधाधिक थरथरा कापती । प्राशन करिती तीर्थ, हिमज्वर, इतर रोग करपती ॥ १ ॥ विठ्ठलमंदिर सुरेख । दुसरे देऊळ बालाजीचें । भीमनाथ, केदार राममदिर रंगामेजीचें । खंडेराव दक्षिणेस, उत्तरपंथीं वेचराजीचें । महाकाळी–लक्ष्मी, लाक्षणिक मुख जीचें । गोजिरवाणी मूर्त नांव नारायण सुंदर जीचें । कांहीं पुढें बाहेर महंमदवाडीत घर काजीचें ॥ चाल ॥ किती धर्म हरीभक्तीचा होतसे । लल्लू पारख खुषवक्तीचा दिसतसे । सामळ सौदा नक्तीचा करितसे । दैवशाली गोपाळराव मैराळ यांची अपार संपत्ति । खुशाल, अंबादास, रतनजी असे कितीक धनपति ॥ १ ॥

हें वर्णन कदाचित् पूर्वीच्या बडोद्याचें ठरेल. आतांच्या बडोद्याचें वर्णन एका अर्वाचीन कवीनें पुढील प्रमाणें केलेलें सांपडतें.

## वटपुरी ( बडोदें ) वर्णन.

### ( श्लोक. )

वटोदरपुरी पुरा बहुत वर्णिली ऐकिली ।
परंतु नयनीं तिला अजवरी न म्यां देखिली ॥
सुविद्य बहु चांगला नृपति[1] राज्य धर्मे करी ।
अशा नगरिं वास तो सतत मन्मति आदरी ॥ १ ॥

सुभव्य भवनें तिथें सकल वीथिका सुंदर ।
सदा हरित बाग[2] हीं कुसुमगंधयुक्तांतर ॥
जिथें फिरति नागरी[3] स्वपति संगती सुंदरीं ।
पुरी पसरली असे अजल[4] कौशिकीच्या तिरीं ॥ २ ॥

घरोघरिं भरीं स्वयें नळ जळासि रात्रंदिनीं ।
प्रकाशित करी निशीं नगरभाग सौदामिनी ॥
धनंजय रथें भरी अमित संपदा आणुनी ।
सुसस्ययुत भूमि ही करित इंद्र तो वर्षुनी ॥ ३ ॥

कृतांत हटवावयासि शतसंख्य रुग्णालयें ।
तमास पळवावया पुरपुरींत विद्यालयें ॥
कला कुशलता नसे दृढतनु स्वविद्या जरी ।
मनुष्यपण जाय ये पशुकळाचि राष्ट्रावरी ॥ ४ ॥

पटादि रचनास या बहुत देशिं कार्यालयें ।
सुविद्य जन येउनी वसति येथ राजाश्रयें ॥

---

१ श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड, २ कमीटिबाग ( पब्लिक पार्क ). ३ नागरजातीच्या ४ जलरहित विश्वामिति नांवाची नदी.

अवश्यक करी प्रजेस नृप शाहणा शिक्षण ।
दिसे विमल जाहलें प्रतिचि-पूर्व-संमिश्रण ॥ ५ ॥
कला कुशलता बळें मिळति संपदा शारदा ।
सुवस्तु अनुकार्यशा जुळविल्या नृपें ज्ञानदा ॥
असंख्य जन येउनी बघुनि जाति वस्त्वालय[५] ।
सुकीर्ति पसरी जगीं प्रथम राज्य तेजोमय ॥ ६ ॥
विशाळ सर[६] एक तें नगर मध्यवर्ती असे ।
जना विमल तें करी धुवुनि वस्त्र देहा तसें ॥
शिवा-शिव तया तटीं वसति भव्यशा मंदिरीं ।
मुलें शिकति इंग्रजी पढति कन्यका सुंदरी ॥ ७ ॥
कलाभवन शास्त्र तें शिकवि शिल्प विज्ञान तें ।
अशी दुसरी शाळ ना भरतखंडि सर्वांमतें ॥
इथें असति इंग्रजी पढविण्यास विद्यालयें ।
तशीं न इतर स्थळीं रचिलि भासती त्या **मयें** ॥ ८ ॥
विशाळ बहु मंदिरें नृपतिचीं पहा चार[७] तीं ।
सुरम्यतर बांधणी रुचिरवस्तु-भांडार तीं ॥
वनोपवन वेष्टितें तरुलतादि शोभान्वितें ।
जाणों[२] खुलति कामिनी विमल अंबरें चित्रितें ॥ ९ ॥
ध्वनी-वहन-यंत्र तें सकल जोडी कार्यालया ।
सुदूर परि ऐकती नृपति कार्य साधावया ॥
निरोप इथुनी तिथें पळ न लागतें जावया ।
अशी अजबयुक्ति ही मिळत येथ पाहावया ॥ १० ॥
स्थळावर फिरे सदा तुरगयान[३] मार्गांतरीं ।
गजोष्ट्र नर वाहनें वृषभयान नानापरी ॥

५ पदार्थसंग्रहालय ६ तळें. ७ चार मंदिरांचीं नांवें येणेंप्रमाणें १ जुना राजवाडा, २लक्ष्मीविलास३ मकरपुरा, ४ नजर बाग.

द्विचक्रपदवाहनें[४] पवनयान[५] तें भैरव ।
त्वरें पळति कोंदतो गगनिं थोर घंटारव ॥ ११ ॥

देवी स्वयें रक्षित उत्तरेसी । मल्लारि सांभाळित दक्षिणेसी ॥
पूर्वावनातें करि भद्रकाळी । श्रीभीमनाथ प्रतिचीस पाळी ॥ १२ ॥

जानकीतनय.

---

होनाजी बाळ व सगनभाऊ यांनीं बडोदें येथें केलेली कविता ' वीरक्षेत्री लावण्या ' या पुस्तकांत छापली आहे. कै श्री. खंडेराव महाराजांनीं होनाजी बाळाचा केलेला सत्कार त्यानें आपल्या पुढील लावणींत वर्णन केला आहे.

लावणी.

वीरक्षेत्रिं प्रभुछत्र शिरावर स्तविति हस्त जोडुनी ।
घेऊनी मुशाफर वेश देश कुठ जात असा सोडुनी ॥ ध्रु ॥

धर्मराज्य गायकवाडी असे नाहीं दुसरें स्थल !
छपनदेशिचे गुणिजन येती या जागीं अपवळ ॥ चाल ॥

प्रभु खुष तुम्हां क्षत्रीहो साजणा । नेमणूक
सनदीं पत्रीं हो साजणा । दिलि करुनि मशाल

छत्री हो साजणा । चाल । तुम्हि मानकऱ्या संमतीचेजी
मुजंर ताजीम रगतीचेजी । नित्य चालू ताट पंगतीचेजी ।

---

( २ ) टेलीफोन, ( ३ ) ट्रॅमवे ( ४ ) सायकल ( ५ ) मोटारगाडी,

प्रभुश्रणी खंडेराव गांव बक्षीस दिला तोडुनी ।
घेऊनी मुशाफर वेश देश कुठ जात असा सोडुनी ॥ १ ॥

* * * *

श्रीमंत खंडेराव महाराजांच्या कारकिर्दीत मुद्रणकलेसही अधिक उत्तेजन मिळालें. त्यांनीं कित्येक राज्योपयोगी ग्रंथ, मुलकी व न्यायखात्याचे नियम व हत्तीघोडे यांच्या आयुष्यक्रमाबद्दल ग्रंथ छापविले आहेत. होनाजी बाळ व सगनभाऊ नंतरच्या शाहिरांत येथें कुशाबा घोंगडे, रामा आळेकर व भाऊ डांगे ( पावागढ पोवडाकर्ता ) वगैरे वाखाणण्यासारखे शाहीर होऊन गेले.

सर्वांत अधिक परिचित व बडोद्यांतील अबालवृद्धांचे तोंडी असलेला असा पावागडचा पोवाडा आजमितीस पुढलिप्रमाणें ह्मणण्यांत व एकण्यांत येत असतो.

## पावागढचा पोवाडा.

मोठा अवघड गड सातपुडा पावागढ बिकट पलवाडा ।
रांगडा मुलुख रजवाडा सातपुड्याचा पडला वेढा ॥
॥ चाल ॥ सुमित्राचा प्राण जाता । लागली चिंता रघुनाथा ।
मारुती द्रोणागिरी आणिता । पडला पाव खडा ॥ धृ० ॥
किर्रे झाडी दरी डोंगर, आंत नानापरींचे जनावर ।
न इकडे रणीं रणशूर, कोळि कठिण भिलांचा मार ॥
॥ चाल ॥ पावागड पुण्य पवित्र । पुण्यवान गाधी पुत्र ।
तप करि ऋषि विश्वामित्र । महायोगेश्वर ॥ चाल ॥

तिन कोस उंच डोंगर, बारा कोसांचा फेर ।
तिथ चंपावती सुंदर, लावण्य स्वरुप सुकुमार ॥ चाल ॥
मोठे मोठे शूर राक्षस । काळया चाप्याच्या चौकीस ।
चंपावति भर निद्रिस्त । अखंडवेळभर ॥ चाल ॥
काळ सैन्य भूज कुमार, वय पचविसाची उमर ।
दैत्यांचा करुनि संहार, सर केलि चंपावति नार ॥ चाल ॥
त्याला युगें लोटुनि गेले । राजे पताजि रावळ झाले ।
शहर चापानेर वसवीले । बहुत गुलजार ॥ चाल ॥
कोट किल्ले [illegible] [illegible], जाणे [illegible] लंकापूर ।
असे विलास करी वेळभर, जसा गोकुळांत श्रीधर ॥
असे विलास करी राजेंद्र, जसा अमरावतिमधिं इंद्र ।
रस रंग लुटी तिथ राजेंद्र, झडे चौघडा । मोठा ॥ १ ॥

जसा रावण लंकापूरी तसा पताजि चापानेरीं ।
त्यानें द्वादश असति केल्या नारी करि विलास राजमंदीरी ॥
चाल । सण दसरा आलि नवरात्र । मोठा आनंद राजवाड्यांत ।
खेळती गर्भा चौकांत । मिळुनी साऱ्या नारी ।
कुणि नेसुनि जरि जरितारी कुणि पैठणि कुणि शेलारी ।
शिणगार कशानिया भारी एकापरिस एक चढ नारी ॥
चाल । स्थळ पावागढ किल्यांत । कालिका माता हर्षांत ।
येइ चापानेरीं । कटि कसुनि शुभ चंदेरी, दोन्ही हातांत
चुडे सोनेरी । येऊनी राज मंदीरी गर्भा खेळे मिळुनि
साऱ्या नारी ॥ चाल ॥ शिणगार करुनि जगदंबा ।
भर बारा वर्षामधिं अंबा । स्वरुपामधि केवळ बिंबा ।
नटुनि गोंजारी । राजा पाहुनि धरणीवरी पडे मूर्छित
येऊनि घरीं । बहु कडुन धावुनि मानकरी अंबिराज
सावध करी ॥ चाल ॥ राजा विसरुनि गेला देहभान ।

लागल विषयाचें ध्यान । लागला जिव्हारी बाण ।
पाहुनि राजा वेडा ॥ मोठा अवघड ॥ २ ॥
गर्भी खेळुनिया भवानी जातानिघुनी आपुल्या स्थानीं ।
राजा पताजि गडी येऊनी होइ अडवा पुढें होवोनी ।
। चाल देवि म्हणे कां धरिलेसमजला । माग प्रसन्न झालें
मी तुजला । राजा म्हणे प्रीतिविण जिव सुकला। । पाहुनि पद्मिनी ।
मग बोले जगाची जननी माग माग मेल्या दुष्टा अज्ञुनी ।
मग बोले तसाच परतोनी नाहीं सोडणार भोगल्या वाचोनी ।
चाल । मग झाला अनुताप । मनिं भरलें तिळ तिळ पाप ।
हात आपटुनि दिधला शाप । देविनें कडकडुनी ।
लागो अग्नी होवो धुळ धाणी जावो सत्यानास होवोनी ।
कुळमुळ जावो राज्य बुडोनी शापदिला आदि मायेनी ।
॥ चाल ॥ दाविलें स्वरुप विक्राल । दोन्ही हातांत समशेर
त्रिशुल । अग्निचे काढि भुभुकार । काढि वदनांतून ।
झाली लाल लाल अग्नीवाणी । वाटे जाइल ब्रह्मांड गिळुनी ।
चाल ॥ मग राजाचि शुद्दबुध गेली । त्यानें आदिमाया ओळखलें ।
म्हणे गोष्ट नाहीं बरी झाली । पाहुनि राजा वेडा ॥ मोठा ॥ ३

× × ×

हा गढ अथवा डोंगर बडोद्यापासून ३० मैलाचें अंतरावर असून तो सपाटीपासून सुमारे २५०० हात उंच आहे. याचें नांव 'पावागढ' कां पडलें याविषयीं अनेक दंतकथा ऐकण्यांत येतात. कोणी म्हणतात कीं यांचें नांव पूर्वीं 'पावकगढ' असे आणि कोणी म्हणतात पवनगढ. असेंही म्हणतात कीं फार प्राचीन काळीं हें विश्वामित्रऋषीचें निवासस्थान असे.

तें तसें असो किंवा नसो. म्हणजे महर्षींचें निवासस्थान जरी नसलें तरी विश्वामित्री नदीचें हें उगमस्थान मात्र खास आहे.

या गडाखालीं असलेल्या चांपानेर शहरास पावागडापासून विभक्त करतां येत नाहीं. पावागडचा इतिहास तोच चांपानेरचा इतिहास. तथापि चांपानेरापेक्षां पावागडची प्राचीनता अधिक आहे. चांपानेर शहर कोणी व केंव्हा वसविलें यासंबंधीं अशी माहिती मिळते कीं आणाहिलपूर पाटण वसवून, त्या ठिकाणीं इ. स. ७४५ पासून इ. स. ८०६ पर्यंत राज्य करणाऱ्या राजा वनराजाचा चांपा नांवाचा प्रधान असे व या चांपानें हें शहर आपल्या नांवानें वसविलें.

येथील वरील पोवाडयाचा विषय बनण्याचे कथानक सुमारें पांचशें वर्षाचें जुनें असून, यांतील नायकाचा इतिहास हाच चांपानेरच्या राज्याचा शेंवटचा इतिहास होय. पताजी रावळ असे ज्यास म्हटलें आहे, त्याचें नाव जयसिंहदेव होय. पावागडच्या पताई रावळांत शेंवटचा व सर्वांत अधिक परिचित असा हाच जयसिंहदेव आहे. याचा सुलतान महंमद बेगडा याच्याकडून पराभव झाल्यापासून चांपानेरच्या स्वातंत्र्याचा लोप झाला व तेंव्हापासून अनेकांच्या ताब्यांत जात जात हल्ली तें ब्रिटिशसरकारच्या पंचमहाळांत समाविष्ट झालें आहे.

कै. श्रीमंत खंडेराव महाराजानंतरचा सुमारे दहा वर्षांचा म्हणजे सन १८७० पासून सन १८८० पर्यंतचा काल दोन

निरनिराळ्या व परस्परविरोधी राज्यक्रांतींत गेल्यामुळें त्यांचें परिणामही परस्परविरुद्ध कसे होत गेले, हें पाहण्यासाठीं लांब जावयास नको. या काळांत अनुक्रमें कै. श्रीमंत मल्हारराव महाराजांची कारकिर्द पहिल्यानें येत असल्याकारणानें पहिल्यानें त्यांच्याच कारकिर्दीचें सिंहावलोकन करूं. यांच्या वेळच्या राज्यकारभाराविषयीं व त्या वेळच्या परिस्थितीविषयीं त्यांच्याच चरित्रकारानें पुढीलप्रमाणें म्हटलें आहे. तो म्हणतो:-" नाटकाच्या रंगभूमीवर कांहीं पात्रें येऊन बीभत्स, भयानक आणि करुणरसेंकरून श्रोत्यांची आणि प्रेक्षकांचीं मनें अगदीं खिन्न, भयभीत आणि दु:खित करितात, आणि मग शेवटीं एक दोन पात्रें रंगभूमीवर येऊन शांतरसानें त्या श्रोत्यांचीं व प्रेक्षकांचीं मनें आनंदोल्लसित करून पूर्वीं झालेल्या मनोविकारास विसरवितात; तद्वत मल्हारराव महाराज यांच्या कारकिर्दरूप नाटकाचा परिणाम झाला. त्यांच्या राज्यकारभाररूप रंगभूमीवर नानाप्रकारचीं बीभत्स व भयंकर पात्रें येऊन, बडोद्याच्या प्रजेस अगदीं भयभीत आणि पराकाष्ठेचें दु:खित करुन टाकलें होतें, आणि आतां पुढें काय होतें कोण जाणें या विषयीं तिला मोठी काळजी उत्पन्न करून ठेवली होती. लॉर्ड नॉर्थब्रुकरूपी नाटककारानें ह्या नाटकाची संविधानरचना कोणत्या प्रकारची केली आहे, हें दु:खपरिणामक नाटक आहे किंवा सुखपरिणामक नाटक आहे, हें कांहीं वेळ लोकांस कांहीं कळेना. परंतु त्या संशयाची निवृत्ति लवकरच

झाली. कारण थोड्याच वेळानें ह्या रंगभूमिवर जीं पात्रें आलीं त्या योगानें हें सुखपरिणामक नाटक आहे, असें समजून आलें इतकेंच नव्हें तर त्या पात्रांनीं आपलीं कामें इतकी चांगलीं केलीं कीं, श्रोत्यांस आणि प्रेक्षकांस मागें झालेल्या दुःखांचा विसर पडून इतकार आल्हाद झाला कीं, त्यांस जसें काय आपण दुःख अनुभवलेंच नव्हतें असें वाटलें *

अशा धामधूमीच्या व अस्वस्थतेच्या कालांत बिचाऱ्या साहित्याची उपेक्षा न होण्याची अपेक्षाच कशाला ?

सन १८७५ पासून सन १८८० पर्यंतचा काल हा. कै. महाराणी जमनाबाई साहेब गायकवाड यांच्या कारकिर्दीचा काल होय. आणि या कालांत प्रत्यक्ष वाङ्मयनिष्पत्ति जरी कांहीं झाली नाहीं, तरी महाराष्ट्र संस्कृतीची छाप कायम राहण्यासारखीं अनेक कृत्यें या राणी साहेबांचे कारकिर्दींत होत असत. त्यांची नैसर्गिक तीव्र बुद्धि, त्यांनीं संपादन केलेलें अनेक विषयांचें ज्ञान, त्यांचें चातुर्य व त्यांचें विनतशील वर्तन, त्यांचें पराकाष्ठेचें कोमल अंतःकरण आणि विशेषतः त्यांची धर्मबुद्धि इत्यादिकांच्या योगानें त्यांच्या समयीं अनेक महाराष्ट्रीय गुणीजनांस व विद्वान लोकांस उत्तेजन व उदार आश्रय मिळत असे. "महाराणीसाहेबांनी मोठ मोठे साधु, महंत, शास्त्री, विद्वान वगैरे

* देवकृत श्री. मल्हारराव महाराज गायकवाड यांचा खरा इतिहास पृ. ३५५.

दा. क्र. २८८५

लोकांस वारंवार देणग्या व बक्षिसें देण्यांत बराच पैसा खर्च केला. त्यांनीं इ. स. १८७७ सालीं जुलै महिन्यांत पैठणकर बुवास एक सुंदर व तरुण हत्ती शृंगारून बक्षीस दिला. या औदार्या-मुळें त्यांची कीर्ति सर्व महाराष्ट्रांत विशेष पसरली ×

या काळांतील या बाबतींतील येथील दुसरी व्यक्ति म्हणजे सुप्रसिद्ध गोपालराव मैराळ हे होत. " दानधर्मविषयीं व वैभवा विषयीं गोपाळराव मैराळ हे राजाची दुसरी प्रत होते. सरकरांतून ज्याचा सत्कार झाला त्याचा रावसाहेबांकडून व्हावयाचाच. राव-साहेबांचा स्वभाव फार सौम्य होता. आगत स्वागत करण्याची त्यांची रीत फार लीनतेची व प्रौढतेची असे. या सत्पुरुषास दया तर इतकी होती कीं एखादा दुःखी मनुष्य पाहिला म्हणजे त्यांचें अंतःकरण मनस्वी द्रवत असे. कोणीही शिष्ठ गृहस्थ बडोद्यास आला म्हणजे त्याचा सत्कार रावसाहेबांकडून व्हावयाचाच. मग तो मोठा असो कीं साधारण असो. विद्वान ब्राम्हणांचें तर तें मोहरघरच होतें. त्यांच्या मनीषा रावसाहेब मोठया संतोषानें तृप्त करीत. त्यांच्या वाडयांत कधी ब्राह्मणभोजन नाहीं व हरिकीर्तन नाहीं असा दिवस विरळा. सर्वदा कांहीं ना कांहीं तरी धार्मिक कृत्य चालूं असेच. नित्य त्यांच्या पंक्तीस शेंकडो मंडळी भोज-नास असे. वर्षांतून गणपतीचे ते तीन उत्साह करीत असत. त्या दिवसांत नित्य हजारों ब्राम्हणांस भोजन मिळत असे व हरि-

+ मुजुमदारकृत महाराणी जमनाबाई गायकवाड यांचें चरित्र पृ. १८०

कीर्तनांनीं व इतर धार्मिक कृत्यांनीं त्यांचा वाडा अष्टौप्रहर दुमदुमलेला असे +

तथापि सन १८७५ पासूनचा पुढील काल बडोदें राज्याचा पूर्ण भरसराटीचाच काल समजला जाईल. कारण याच सालांत कै. राजा सर टी माधवराव या विद्वान व राजकार्य धुरंधर पुरुषास येथील दिवाणगिरीचीं वस्त्रे मिळालीं व याच सालांत प्रस्तुतज्या महाभाग्यशाली श्रीमंत सयाजीराव महाराजांचें दत्तविधान झालें. आणि बडोदें राज्यास ज्या अराजकतेच्या ग्रहणानें ग्रासलें होतें त्याचें तें ग्रहण सुटलें. तेंव्हांपासून आजतागाईतचा म्हणजे सुमारें पन्नास वर्षांच्या वाङ्मयनिष्पत्तीचा इतिहासही येथील दुसऱ्या अनेक चळवळींच्या इतिहासाप्रमाणें पूर्ण अखंडित असल्याकारणानें त्याविषयीं आम्हीं यथानुक्रमच लिहिणार आहोंत. सध्यां येथें एवढेंच नमूद करणें जरूर आहे कीं शिळाप्रेस जाऊन खिळेप्रेस येथें माधवरावजींच्या कारकिर्दीतच आले. राज्यकारभाराचीं सूत्रें हातीं घेतल्यावर त्यांनीं येथें ज्या सुधारणा सुरू केल्या, त्यांतील सरकारीमुद्रणसंस्थेची मोठ्या प्रमाणावर स्थापना करणें ही एक होय. हा छापखाना सन १८७७–७८ झालीं स्थापन झाला असावा. कै. अच्युतशास्त्री चिपळूणकर हे त्यावरील पहिले व्यवस्थापक होत. या खात्यावर सन १८७९–८०

---

+ देवकृत श्री मल्हारराव महाराज गायकवाड यांचा खरा इतिहास पृ. ४४.

च्या बडोदा ऍडमिनिस्ट्रेशन रिपोर्टांत सन १८७८–७९ सालीं रु. १०,६९१ व सन १८७९–८० सालीं रु. १७,१२८ खर्च झाला असल्याचें नमूद केलें आहे. यावरून माधवरावजींच्या काळींच सरकारी छापखाना किती भरभराटीस आला होता याची चांगलीच कल्पना होते.

**वर्तमानपत्रें**

येथील ज्यास पहिलें म्हणतां येईल असें वर्तमानपत्र सन १८७५ सालीं रा. रा. गोविंद बाबाजी जोशी यांनीं काढलें होतें. हे गृहस्थ या वेळीं कै. श्रीमंत मल्हारराव महाराजांवर कर्नल फेअर ( त्या वेळचा बडोद्याचा रेसिडेंट ) याला विषप्रयोग केल्याचें संबंधानें जें कमीशन बसलें होतें, त्या संबंधानें मुंबईच्या एकदोन वर्तमानपत्रांच्या तर्फे रिपोर्टर या नात्यानें हजर राहिले होते. " या वेळीं कमीशनमध्यें दर रोज काय काम चाललें या हकीकतीचें मराठींतील वर्तमानपत्र लोकांस वाटण्याकरितां मी काढीत असे व हें बातमीपत्र रा. अच्युत अनंत चिपळूणकर यांनीं आपल्या खासगी छापखान्यांत फुकट छापून देण्याचें कबूल केलें होतें"* असें रा. जोशी यांनीं आपल्या 'माझे प्रवासाची हकीकत' या पुस्तकांत नमूद केलें आहे. या पत्राचें आयुष्य जरी फक्त शब्दशः चारच दिवसाचें होतें, तरी येथील हें पहिलें वर्तमानपत्र दैनिक पत्र होतें, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. आणि एकून पराकाष्ठेचा धामधूमीचा व लोकांत खळबळ उडवून टाकणारा

कालच वर्तमानपत्रांच्या पैदासीचा काल होय, असें दृष्टोत्पत्तीस येतें.

या नंतर सन १८८४ सालीं निघालेलें ‘ बडोदावत्सल ’* हेंच बहुधा येथील दुसरें वर्तमानपत्र असावें. हें निमसरकारी व मराठी-गुजराथी वर्तमानपत्र मात्र बरींच वर्षें चाललें. त्यानंतर सुमारें सात आठ वर्षांनीं म्हणजे सन १८९३-९४ सालीं शेट दामोदर सावळाराम यंदे यांनीं आपलें ‘ सयाजीविजय ’ पत्र सुरूं केलें. तेव्हापासून आतांपर्यंत येथें ‘विचारसागर’, ‘देशभक्त’, ‘पुढारी’, ‘ फत्तेसिंहगॅझेट ’, ‘ चंद्रशेखर ’ वगैरे बरींच वर्तमानपत्रें निघालीं व बुडालीं. आता फक्त ‘ सयाजीविजय ’ व सुमारें सात वर्षांपूर्वीं निघालेलें ‘ जागृति ’ हीं दोन वर्तमानपत्रें नियमीतपणें चाललीं आहेत. ‘ जागृति ’ हें पत्र विशिष्ठ पक्षाचें असून ‘सयाजीविजय’ हें पत्र सामान्य आहे आणि हेंच त्याच्या लोकप्रियतेचें गुह्य आहे. हें पत्र काढतांनां या पत्राच्या चालकांनीं आपणापुढें जें ध्येय ठेविलें होतें त्याची कल्पना त्यांनींच दिलेल्या पुढील जाहिरातीवरून उत्तम रितीनें होऊं शकते. त्यांची जाहिरात अशी.

* जोशीकृत ‘ माझे प्रवासांची हकीकत ’ पृष्ठ ६०२

श्रीमंत सरकार सयाजीराव महाराज गायकवाड सेना-
खासखेल समशेर बहादूर यांचे विद्याकलादि गुणांच्या
चिरकाल स्मरणार्थ

**श्रीसयाजीविजय.**

आबालवृद्ध स्त्रीपुरुषांच्या सतत उपयोगीं पडणारें
साप्ताहिक वर्तमानपत्र.

संवत १९५० कार्तीक शुद्ध ३ पासून प्रत्येक शनिवारी
सायंकाळीं प्रसिद्ध होणार.

व असें जें या पत्रानें ३२ वर्षांपूर्वी म्हटलें होतें तें, हें पत्र आजमित्तीपावेतों अक्षरशः खरें करून दाखवीत आहे, असें या पत्राच्या प्रत्येक वाचकास वाटल्यावांचून राहणार नाहीं. आपल्या विशिष्ठ प्रकारच्या धोरणानें या पत्रानें आजपर्यंत जी लोकप्रियता संपादन केली आहे ती या पत्राच्या चालकांस भूषणावह आहे हें खरेंच; परंतु त्याबरोबरच नुस्त्या 'सयाजी' या नांवांतच इतकी जादू भरली आहे व या नांवाचा प्रत्येक पत्येक महाराष्ट्रीयास इतका अभिमान व आपलेपणा वाटतो कीं त्या नांवाशी संलग्न झालेलें हें पत्रही त्याला-त्या नांवामुळें-आदरणीय वाटतें, हेंही पण तितकेंच खरें आहे. तसेंच या पत्राच्या व्यवस्थेंत पुष्कळ परिवर्तन होऊन, हल्लीं तें जरी इंदुप्रकाश

पत्राची साप्ताहिक आवृत्ति बनलें आहे, तरी त्याच्या प्रकाशनाचें स्थळ मुंबई व बडोदें असें छापण्याची चालकांची अद्यापि वहिवाट आहे. कारण ग्रंथसंपादक मंडळी मुंबईस गेल्यापासून 'सयाजीविजय' पत्रही मुंबईंत छापलें जातें. श्रीसयाजीविजयपत्र मुंबईस गेल्यापासून स्थानिक मराठी वर्तमानपत्राची कित्येक वर्षांपासून भासणारी उणीव कांहीं अशीं 'जागृति' पत्रानें भागविलीं असून तिच्याविषयींची रा. रा. भगवंत बळवंत पाळेकर यांची चिकाटी प्रसंशनीय आहे.

**मासिक पुस्तकें**

महाराष्ट्रीय ज्ञानकोश मंडळ संपादित महाराष्ट्रवाङ्मय सूचींतील मासिक पुस्तकांच्या यादींत 'विद्याकल्पतरु' नांवांच्या मासिकाची नोंध असून तेथेंच हें मासिक सन १८६८-६९ सालीं बडोदें येथें रावजी केशव सांबारे * यांच्या संपादकत्वाखालीं चाललें असल्याचें निर्देशिलें आहे. हीच नोंध येथील सर्वांत जुन्या मासिक पुस्तकाची असावी असें आम्हांस वाटतें. आणि या

---

* हा महाराणी जमनाबाई साहेबांचा अत्यंत विश्वासु गृहस्थ राजपत्नीच्या कामासाठीं मुंबईस गेला असतां त्याच्यांवर चोरीचा खोटा आरोप ठेवून त्याचा कर्नल बार साहेबांच्या मदतीनें पकडून बडोद्यास आणिलें. त्याच्यांवर दाखविण्यापुरतें रीतसर काम चालवून मल्हारराव महाराजांनीं त्याला कैदेंत टाकलें. कैदेंत असतां तुरुंगांतील कामदार भुजंगराव याचेकडून रावजीस जबरदस्तीनें वीष पाजल्यामुळें त्याचा तेथेंच अंत झाला !

न. जमनाबाई गायकवाड यांचें चरित्र पृ ८१

नोंधणीवरून " या राज्यांत कै. श्री. गणपतराव महाराजांचें कारकिर्दींत या मुद्रणकलेस सुरुवात झाली व कै. श्री. खंडेराव महाराजांच्या कारकिर्दींत तिला अधिक उत्तेजन मिळालें " या श्रीमंताच्या विधानास चांगलींच बळकटी येते. या पुढील दहा-पंधरा वर्षांच्या धामधूमीच्या व अस्वस्थतेच्या कालांत अशा वाङ्-मयनिष्पत्तीस आळा कां व कसा बसलेला दिसतो, याचें दिग्द-र्शन वर करण्यांत आलेंच आहे. यानंतर येथें वाङ्मयविषयक जी चळवळ झाली ती सारी सन १८८० नंतर. येथेंच पुढें सन १८८५ सालीं ' विविधकलाविस्तार ', सन १८८७ सालीं ' धनुष्य ', सन १८९३–९४ सालीं अमृत सखाराम वणीकर यांचें ' बालांकूर ', जगन्नाथ विष्णु दामले व डॉ. गंगाधर बाळ-कृष्ण परांजपे यांचें ' धंदेशिक्षण ' व माधव मैराळ सुरतकर यांचें ' कलाशिक्षण ' इत्यादि मासिकें निघालेलीं दिसतात. या पैकीं ' बालांकूर ' मात्र आठ दहा वर्षें नियमितपणें चाललेलें दिसतें आणि धंदे शिक्षणानेंही दुसरें वर्ष पाहिलें असावें. पुन्हां कांहीं वर्षें या दिशेनें होणारे प्रयत्न शिथिल होऊन, पुढें सन १९१० च्या सुमारास ' रसिक विहार ' नांवाच्या मासिकाचे एक दोन अंक पाहण्यांत आलेलें स्मरतात. परंतु ते स्मरण देण्या-पुरतेंच. या नंतर ज्यांची सर्वत्र वाखाणणी झाली अशीं सन १९१३ सालीं कै. जनार्दन सखाराम कुडाळकर यांचें ' लाय-ब्ररी मिसलेनी ', सन १९१४ सालीं 'व्यायाम' व सन १९२२

साली येथील सहविचारिणी चें ' सहविचार ' इत्यादि नियतकालिकें निघालीं. लायब्ररी मिस नी त्रैमासिक सात वर्षें उत्तम प्रकारें चालून रा. कुडाळकरांच्या अकाळ निधनामुळें पुढें बंद पडलें. आतां येथें फक्त ' व्यायाम ' व ' सहविचार ' ही दोनच नियतकालिकें सुरळीतपणें चाललीं असून बाकीचीं सर्व मासिकें बंद पडलीं आहेत.

**छापकाम आणि छापखाने.**

येथेंही इतर शहराप्रमाणें आरंभी शिळाप्रेसवर काम होणें सुरू झालें होतें असें दिसतें. रा. अच्युत अनंत चिपळूकर यांचा ' विद्वभ्दूषण ' छापखाना हाच बहुधा येथील पहिला खानगी शिळाप्रेस असावा. हा छापखाना यांनीं केव्हां काढला हें समजणें आज जरी शक्य नाहीं तरी तो सन १८७४–७५ सालीं चालत होता हें खास. यांच्या छापखानांत छापलेलीं रा. वणीकरकृत ' गुलिस्तानचें मराठी भाषांतर ', रा. गोपाळ नरसिंगराव देशपांडेकृत ' सुबोध प्रार्थना ' ( सं. १९३० ) वगैरे जीं पुस्तकें आमच्या पाहण्यांत आलीं आहेत त्यावरून हा छापखाना त्या वेळीं चांगला भरभराटींत असावा असें वाटतें. याच छापखान्यांत येथील पहिलें मराठी वर्तमानपत्र छापलें जात असें व हेंच अच्युतशास्त्री पुढें सरकारी छापखान्याचे पाहिले व्यवस्थापक झाले हें वर आलेंच आहे. ' सुबोधप्रार्थना ' या पुस्तकाशिवाय रा. पुणेकरकृत ' आहिल्याबाई होळकर यांचें चरित्र '

हें दुसरें सर्वांत जुनें पुस्तक आहे. हें पुस्तक सुमेरीस यांच्या दुसऱ्या शिळाप्रेसांत छापलें असून याच्या प्रकाशनाचें साल इ. स. १८७२ हें आहे. या वेळीं येथें आणखीं एखादा शिळाप्रेस अथवा आणखीं कांहीं पुस्तकें छापलीं असावींत; नसावींत असें ह्मणतां येणार नाहींत. परंतु असतील तरी तीं आमच्या माहितीच्या आटोक्याबाहेरचीं आहेत.

येथील 'बडोदावत्सल' वर्तमानपत्राप्रमाणें 'बडोदा-वत्सल' छापखाना हाच दुसरा सार्वजनिक खिळे छापखाना होय. पुढें दामोदर सावळाम यंदे यांचा 'पूर्णचंद्रोदय' छाप-खाना निघाला. यांत सयाजीविजयपत्र, ग्रंथसंपादक आणि प्रसा-रक मंडळींचे ग्रंथ व इतर छापकामें होऊं लागलीं. तेव्हांपासून आतांपर्यंत येथें 'लक्ष्मीविलास', 'सयाजीविजय', 'आर्य-सुधारक', 'न्हाणामित्र', 'भारत', 'जागृति' 'राम-विजय', 'लक्ष्मीविजय' 'विद्याविलास', 'सरस्वति' इत्यादि सुमारें दहा पंधरा छापखाने निघाले असून, हे सर्व छापखाने चांगल्या भरभराटींत असल्याचें दिसून येतात. या सर्व छापखान्यांत मराठी टाइप मुबलक असून प्रत्येक छापखान्यांत थोडें बहुत मराठी काम नेहमी चालू असतें. सारांश, बडोद्याचें मराठी छापकाम बडोद्यांत होण्यासारखी सोय आतां येथें चांगल्या प्रकारची झाली आहे.

खिळ्यांनीं शिळेस मागें टाकलें हें जरी खरें आहे; तथापि शिळेनेंही आपली जागा अद्यापि न सोडण्याची पराकाष्ठा केली

आहे. मोठमोठ्या अक्षरांच्या अथवा चित्रयुक्त छापकामाच्या आणि प्रत्यक्ष चित्रांच्या उपयोगी पडून, अर्वाचीन छापकामाची बरीच जागा तिनें अडकून ठेवली आहे. येथील 'गिरिजारमण लिथोप्रेस' शिळाप्रेसचें सर्व काम करीत आहे व अलीकडे एक ' फोटोझिंको-वर्क्स ' निघाल्याचेंही ऐकण्यांत आहे.

ग्रंथमुद्रणाबरोबरच ग्रंथबंधनाचा विचार करूं. कारण ग्रंथ-कर्तृत्वांत ( Book-making ) ग्रंथबंधनाचाही समावेश होतो. किंबहुना छापण्यामुळें नव्हें तर बंधनामुळेंच पुस्तकास पुस्तकाचें स्वरूप प्राप्त होतें. तेथील सर्व छापखान्यांत ग्रंथबंधनाचें काम सुबलक व चांगलें होत असून, या शिवाय येथील ' चिमणाबाई स्त्रीउद्योगालय ' व ' सरस्वतीबुकबाइंडिंग ' या खासगी परंतु उत्तम संस्थेंत ग्रंथबंधनाचें काम चांगलें होतें. येथील सेंट्रललायब्ररीस तर आपुलीं पुस्तकें बांधण्याकरितां खात्याच्या अंगभूत एक प्रवीण बाइन्डर व तीन मदतनिसांची एक ' बाइंडरी ' ठेवावी लागते. लायब्ररींतील बुकबाइंडिंगचें काम फार सुबक व टिकाऊ असतें. या शिवाय दुसरेंही कित्येक कारागीर बुकें बांधण्याचें काम करीत असतात.

**ग्रंथ प्रकाशन**

येथील वाङ्मयनिष्पत्तीचा काळ जरी कितीही मागें ढक-लला तथापि ग्रंथकर्तृत्वाची व ग्रंथप्रकाश-नाची खरी लाट येथें सन १८८०-८१ नंतर ह्मणजे हल्लींच्या महाराजांच्या राज्यारोहण-कालापासूनच

उसळली. आणि या वेळीं जेथें यक्षिणीनें कांडी फिरविल्याप्रमाणें सर्वच परिस्थिति एकदम बदलून गेली तेथें अनुकूल परिस्थितींत साहित्यसेवेची लाट उसळणें साहजिकच होतें. तसेंच साहित्य-विषयक सुरूं झालेली ही चळवळ एकपक्षीय नव्हती. या वेळीं येथें जसें राज्याकडून तसेंच साहित्यसेवेचे सामुदायिक आणि वैयक्तिक प्रयत्नही होऊं लागले. आणि तेंच आतां आपणास अनुक्रमें पाहणें आहे.

**साहित्याभिवृद्धीचे राजकीय प्रयत्न.**

सन १८८६ सालीं राज्यसूत्रें हातीं घेतांनां आपल्या प्रजेस दिलेल्या सनदेंतील दुसऱ्या कलमांत " आमची प्रजा सुखी रहावी व दिवसें-दिवस तिच्या कल्याणाची वृद्धि व्हावी अशी आमची अंतःकरणापासून इच्छा आहे " असें ह्मटल्या-प्रमाणें करीत असतांना श्रीमंतांनीं जे पद्धतशीर व सनदशीर प्रयत्न केले त्यांचें समग्र निरीक्षण करण्याचें हें स्थळ नव्हे. तसें करण्याचें अवघड काम आह्मांस श्रीमंतांच्या चरित्रलेखका-कडेच सोपविलें पाहिजे. तथापि साहित्याभिवृध्यर्थ महाराजांचे जे प्रयत्न झाले. त्यांचें दिग्दर्शन मात्र आह्मांस अवश्य केलें पाहिजे. परंतु तसें करतांना देखील त्यांच्याविषयीं कांहीं निराळें न सांगतां ते जसें झाले आहेत तसेंच आमच्या वाचकांपुढें मांडणें अम्हांस इष्ट वाटतें.

राष्ट्रकथामाला, महाराष्ट्रग्रंथमाला, विविधविषयग्रंथमाला, क्रीडामाला, सयाजीसाहित्यमाला व सयाजीज्ञानमंजूषा इत्यादि

सदरांखालीं अनेक विद्वानांकडून अनेक पुस्तकें तयार करवून आपल्या मातृभाषेस श्रीमंतांनीं उपकृत करून ठेवलें आहे, हें सर्वविश्रुत आहे. अशा मालांतून प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक पुस्तकाच्या शेंवटीं, आरंभीं पुढील प्रसिद्धीपत्रक छापलेलें असे.

# वाचकासाठीं दोन शब्द.

## श्रीमंत गायकवाड सरकारांकडून ग्रंथप्रसिद्धीचे कामीं होत असलेले प्रयत्न.

" प्रस्तुत वाचकांपुढें येत असलेलीं पुस्तकें **श्रीमंत गायकवाड सरकारांच्या** हुकुमानें तयार झालीं आहेत, याकरितां भाषाभिवृद्धीचे कामीं महाराजांकडून जे प्रयत्न चालले आहेत, ते लोकांस महशूर होणें इष्ट दिसल्यावरून खालीं सांगण्यांत येत आहेतः—

१ पुस्तक चांगलें असल्यास त्यास आश्रय देण्याचे नियम शाळाखात्याकडून ठरले असून त्याप्रमाणें तो देण्यांत येत असतो.

२ श्रीमंत महाराजांची स्वारी कडीप्रांतीं गेली असतां पट्टण येथील संस्कृत ग्रंथसंग्रह त्यांचे पाहण्यांत आला. तेव्हां त्यांतील उपयुक्त पुस्तकांची निवड व्हावी; व जीं चांगलीं ठरतील त्यांचे तरजुमे झाल्यानें ज्यांस संस्कृत येत नाहीं अशा लोकांस त्यांतील ज्ञानाचा लाभ सहज व्हावा या हेतूनें तीन मुख्य विषयांवर चांगलीं संस्कृत पुस्तकें घेऊन तीं मराठींत लिहिण्याविषयीं हुकूम देण्यांत आला. त्याअन्वयें तीं तयार झालीं असून पुढें जास्त पुस्त-

कांचे तर्जुमे करण्याचें काम चालू आहे. श्रावणमास दक्षिणेसारख्या संस्थेतून नवीन पुस्तकें व निबंध तयार होण्याची तजवीज झालेली वांचकांस महशूर असेलच.

३ संस्थानच्या निरनिराळ्या खात्यांचे उपयोगी पडणारीं पुस्तकें परभाषेतून तरजुमे करून किंवा नवीन तयार करून छापण्यांत येत आहेत, व पुढें आणखी अशींच तयार करण्याविषयीं हुकूम देण्यांत आले आहेत.

४. नियमरूपानें छापण्यांत येत असलेलीं पुस्तकें निरनिराळ्या खात्यांकरितां केलीं आहेत, तथापि त्यांचाही मुख्य उद्देश असा आहे कीं, त्यांच्या योगानें लोकास शिस्तीनें काम करण्याची संवय लागावी. अशा प्रकारें शिस्तीनें काम करण्याची संवय आपणांत किती कमी आहे हें सांगावयास नकोच. सरकारवाड्यासंबंधीं झालेल्या पुस्तकांचा तरी उद्देश असाच आहे.

५. सेक्रेटरींच्या मार्फत जीं पुस्तकें आश्रयासाठीं येतात, त्यांपैकी कित्येकांस सवडीनुसार खानगी खात्यांतून आश्रय देण्यांत येत असतो.

६. ह्याप्रमाणें निरनिराळ्या खात्यांच्या नियमांअन्वयें तयार होत असलेल्या पुस्तकांशिवाय श्रीमंत महाराज वेळोवेळीं विशेष हुकूम देऊन व नवीन सूचना करून स्वतःच्या देखरेखीखालीं जवळ असलेल्या लोकांकडून पुस्तकें लिहवून छापवीत असतात. अशा प्रकारें हल्लीं भाषाविषय, इतिहास, शास्त्रीय विषय, पाकशास्त्र, गृहशास्त्र, कायदे, क्रीडाशास्त्र व अश्वकला, वगैरे विषयांवर पुस्तकें प्रसिद्ध करण्याचा क्रम चालू आहे. सामान्य विषयांवर उपयुक्त माहितीचे ग्रंथ **महाराष्ट्रग्रंथमाला** नामक मालेंत प्रसिद्ध होत असून आणखी **राष्ट्रकथामाला** नांवाची दुसरी एक ऐतिहासिक ग्रंथांची माला प्रसिद्ध होत आहे. इंटर्नाशनल साएन्टिफिक् सीरीज नामक मालेंतील इंग्रजी पुस्तकांच्या धर्तीवर निरनिराळ्या शास्त्रीय विषयांवर सोपीं सोपीं पुस्तकें त्या त्या विषयांत प्रवीण अशा गृहस्थांकडून लिहविण्याचें काम बडोद्यांतील कलाभवन नामक शिल्प शाळेचे मुख्य गुरु यांजकडे सोंप-

ग्रंथ संग्रहालय नं. ३५...

विलें आहे. या निमित्त एक मोठी रक्कम खर्च करण्याचें सरकारांनी ठरविलें आहे. त्याचप्रमाणें पाकशास्त्रावरही देशी भाषेत ग्रंथ लिहिण्याचा क्रम सुरू आहे. या विषयावरील ग्रंथमालिकेंत मराठी, हिंदुस्थानी, फारशी, मद्रासी व व इंग्रजी वगैरे पाक क्रियांवरील ग्रंथांचा समावेश केला आहे. आपले राष्ट्रीय खेळ प्रचारांतून जाऊं नयेत म्हणून त्यांच्या माहितीचें एकीकरण करून उपयुक्त इंग्रजी खेळांच्या संग्रहासहित तें छापलें आहे. उर्दू भाषेतीलही कित्येक ग्रंथ छापण्याचेंही काम चालू आहे. ही सर्व पुस्तकें गुजराथी व मराठी ह्या दोन्ही भाषांत प्रसिद्ध करण्याविषयीं सरकारचा हुकूम आहे. ह्यावरून महाराजांची समदृष्टि किती आहे व प्रत्येक उपयुक्त विषयाचें लोकांस शिक्षण देण्याकडे व भाषेची अभिवृद्धि करण्याकडे त्यांचें किती लक्ष आहे हें व्यक्त होत आहेत."

या ग्रंथमालांविषयीं व त्यांतील ग्रंथाविषयीं महाराष्ट्र समाजाचें मत काय हें पाहण्यास लांब जावयास नको. मुंबईचा विविधज्ञान-विस्तार या महाराष्ट्राच्या ज्येष्ठ व श्रेष्ठ मासिकानें सन १९०३ सालीं महाराष्ट्र समाजास या ग्रंथमालांचा परिचय करून देतांना त्यांच्या विषयीं आपला अभिप्राय पुढील प्रमाणें दिला आहे.

श्रीमंतास विद्येनें शोभा न येतां उलटी हीनता येते असा समज बहुतेक सर्व देशांत थोड्या अधिक प्रमाणानें असतो. आपल्या देशांत एखादा लक्ष्मीवंत इंग्रजी शिकावयाला लागला तर लागलीच त्याला चोहोंकडून उपदेश व्हावयास लागतो की तीन पिढ्या पुरेल इतकें द्रव्य संग्रहीं असतां अशी दुर्बुद्धि उत्पन्न होणें हें अवदशेचें लक्षण होय! एखादा ऐश्वर्यवान् पुरुष गाणें, वजावणें शिकावयास लागला की पुरे, त्याला भोंवतालच्या मंडळीस असे विचारण्याचा हक्क आलाच, की, "अहो तुम्हाला आतां

थोडाच गवय्याचा धंदा करावयाचा आहे ? मग दररोज भोपळा हातीं घेऊन कंठशोष करण्यांत काय तात्पर्य ?" इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी इत्यादिकांसारख्या सुधारलेल्या देशांतून सुद्धां अगदीं अलीकडेपर्यंत हाच प्रकार चालू होता. प्रसिद्ध इंग्रज नाटककार कॉन्ग्रीव्ह यास स्वतःच्या कर्तृत्वासंबंधानें फार लाज वाटत असे, व त्याचा हा भ्रम घालविण्याकरितां फ्रेंच ग्रंथकार व्हॉल्टेअर यास त्यावर आपले वाग्बाण सोडावे लागले.

अशी स्थिति चोहोंकडे असतांही सुदैवानें श्री. सयाजीराव महाराजांना अलीकडील इतर राजघराण्यांतील पुरुषांप्रमाणें नवीन तऱ्हेचें शिक्षण मिळालें; व त्यांची बुद्धि तीव्र असल्यामुळें व श्रीमती जमनाबाईसाहेबांसारख्यांची देखरेख असल्यामुळें लवकरच तें शिक्षण चांगलें फलद्रुप झालें. संपत्ति, वैभव, सत्ता, कीर्ति, सुप्रेम इत्यादि सर्व गोष्टी अनुकूल असतांही त्यांना असलेला विद्येचा जबरा व्यासंग पाहिला कीं दुष्यंतानें शाकुंतल नाटकाच्या सातव्या अंकांत वर्णिलेल्या महर्षींची आठवण होते: ' ज्यांच्या प्राप्तीसाठीं करिती तप ते दुसरे मुनि !! तें बहु येथं असूनी चालें यांचें तप आजुनी. '

नुसतें स्वतः विद्वान् असणें निराळें व इतरांस विद्यादान करण्याचा प्रयत्न करणें निराळें; दुसऱ्यांत विद्वत्व व उच्च नीतिमत्ता या दोहोंचा समावेश होतो. लक्ष्मीप्रमाणें राजनिष्ठशीही सरस्वतीचें वाकडें आहे; असा भलताच समज महाराजांनीं आपला होऊं दिला नाहीं, या बाबतींत त्यांचें वर्तन आमच्या सुधारलेल्या इंग्रजबहादुरांनीही गिरविण्यासारखें आहे. एखाद्या ऐश्वर्यवानाच्या हातून इच्छा असल्यास केवढें महत्कार्य होऊं शकतें हें कोणास पहावयाचें असल्यास त्यानें नुस्तें प्रस्तुत पुस्तकमालेकडे पहावें. आजपर्यंत या मालिकेंतील लहान मोठी मिळून सुमारें पन्नास पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत. तीं सर्व बहुधा भाषांतररूप असून त्यांत इतिहास साहित्य, न्याय, नीति, गृहव्यवस्था, पदार्थविज्ञान वगैरे विषयाचं विवेचन

केलें आहे. चेंडूदांडू खेळणाऱ्या बालकापासून तो मरणाच्या दारीं बसलेल्या जरठापर्यंत प्रत्येकास मनोरंजन व बोध व्हावा अशी विषयाची योजना केली आहे. दरें, या विद्यादानांत पुरुषांकडेच सर्व भर असून स्त्रियांना अगदीं वगळलें आहे असा ही पंक्तिप्रपंच सांपडणार नाही खरोखर ही पुस्तकें प्रसिद्ध करून महाराजांनीं लाखों मेहुणे तृप्त केल्याचें श्रेय घेतलें आहे असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं या पुस्तकमालेखेरीज शाळाखात्याच्या द्वारें नवीन पुस्तकांस उत्तेजन महाराजांकडून मिळत असतें हें सर्वांस महशूर आहेच शिवाय 'ग्रंथसंपादक व प्रसारक मंडळीनें चालविलेल्या स्तुत्य उद्योगास महाराजांचे प्रत्यक्ष व परोक्ष साहाय्य आहे तें निराळेंच.

जन्मदात्याप्रमाणेंच रक्षणकर्ता व विद्यादाता हे पिते होत. आजपर्यंत प्रजेचें यथान्याय पालन करून संपादिलेला पितृत्वाचा मान प्रस्तुतच्या विद्यादानानें महाराजांनीं दृढतर व द्विगुणित केला आहे महाराष्ट्र ग्रंथसंग्रहांत अनेक चांगल्या पुस्तकांची भर घालून आम्हा इतर महाराष्ट्रीयांसही त्यांनीं कायमचे ऋणी करून ठेविलें आहे, असें कृतज्ञ बुद्धीनें आम्ही कबूल करितों, व महाराजांस चिरायु करण्याबद्दल ईश्वराची अनन्यभावाने प्रार्थना करितों."

सेनापति कचेरी मार्फत छापविलेल्या येथील सरदार घराण्यांच्या हकीकती व निरनिराळ्या खात्याकरितां नियमरूपानें छापविलेल्या अनेक पुस्तकांखेरीज या प्रसिद्धीपत्रान्वयें उपरिनिर्दिष्ट मालांतून केवळ राजाज्ञेनें तयार झालेल्या एकंदर मराठी पुस्तकांची संख्या शंभराहून कांहीं कमी नाहीं. हीं सर्व पुस्तकें छापविण्याचा सर्व खर्च राज्यानें करून त्याशिवाय ग्रंथकारास त्यांच्या श्रमाबद्दल चांगलीं पारितोषिकेंही देण्यांत आलीं आहेत. उदाहरणार्थ, सखाराम गणेश मुजुमदार, या कै. श्री: महाराणी

जमनाबाईसाहेबांच्या चरित्रलेखकास पांचशें रुपयांचें बक्षीस बक्षीस दिलें आहे.

महाराजांचा विद्याभिलाप सुप्रसिद्ध आहे. ते स्वतः उत्तम वक्ते आणि कसलेले लेखक आहेत. त्यांनीं कित्येक इंग्रजी, मराठी ग्रंथ व लेख लिहिले आहेत. "कैसरकडून सुलतानाकडे" या पुस्तकाचीं मूळ टिपणें महाराजांच्याच हातचीं आहेत. आणि घरीं असो किंवा प्रवासांत, हा त्यांचा व्यासंग अद्यापि चालू आहे. विशेषतः ते प्रवासांत असतांना नानाप्रकारचीं विद्वान व निरनिराळ्या व्यवसायाची मंडळी महाराजांच्या भेटीस येतात. व या भेटींत त्यांजकडून अनेक उपयुक्त सूचना त्यांनां मिळतात. त्या लक्षांत ठेऊन शक्य तितक्या अमलांत आणण्याचा त्यांचा प्रघात आहे. रिकामा मनुष्य पाहिला कीं त्याच्या पाठीमागें त्यांनीं काम लावलेंच. जवळच्या मंडळीस तर ते सारखे गुंतवून ठेवतात. यासंबंधांत येथील सुप्रसिद्ध साहित्यभक्त व इतिहास-संशोधक रा. रा. गोविंद सखाराम सरदेसाई यांनीं सांगितलेला आपला अनुभव फार मौजेचा आहे. ते म्हणतात " मला त्यांनीं ( महाराजांनीं ) प्रथम ' रीडर ' किंवा ' खासगी चिटणीस ' म्हणून नोकरींत घेतलें आणि पहिल्याच आठवड्यांत मॅकिया-व्हेलीचें ' प्रिन्स ' हें पुस्तक भाषांतर करण्यास सांगितलें. ते चार सहा महिन्यांत तयार होतांच सीलीचें ' **Expasion ofEngland** ' हें दुसरें पुस्तक देऊन त्याचें भाषांतर त्यांनीं

मजकडून करवून घेतलें. त्यावेळीं माझी स्थिति पोहतां न येणाऱ्या इसमास डोहांत फेंकावें तशी झाली ! ह्या माझ्या पहिल्या कृति चांगल्याशा वठल्या नाहींत पण त्यामुळें मला लेखन व्यवसायांत गोडी लागली. एकंदरींत माझ्या हातून इतिहासविषयांत जर कांहीं उद्योग होत असेल तर त्याचें सर्व श्रेय श्रीमंत महाराज साहेब यांसच आहे. " रा. सरदेसाई यांचा हा विनय समर्पक आहे.

अशीं दहापांच पुस्तकें दहापांच मंडळीकडून महाराजांनीं प्रथम यदृच्छेनेंच करविलीं. तेंव्हां त्यांच्या दोन माला रा, सरदेसाई यांनीं सुचविल्या. त्याच ' राष्ट्रकथामाला ' व ' महाराष्ट्र ग्रंथमाला ' ह्या होत. याच सुमारास कलाभुवन स्थापन होऊन त्यांतील इंग्रजी न येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीं लागतील त्या विषयांचीं पुस्तकें तयार करण्याविषयीं प्रो. गज्जर यांस हुकूम झाला. वरील मालांचें काम आरंभीं दोन तीन वर्षें रा. सरदेसाई यांच्याकडेच खानगीखात्यांत होतें व त्याबद्दल महाराजांनीं त्यांनां २००० रुपये बक्षीस दिले आहेत. स्वतःच्या देखरेखेखालीं या कामाचा चांगला पाया बसविल्यावर राजपुत्र विद्यालयाकडील रा. सरदेसाई यांचें काम पुष्कळ वाढल्यामुळें सन १८९४ च्या सुमारास ग्रंथमालांचें हें काम महाराजांनी रा. सरदेसाई यांच्याकडून काढून शाळाखात्याकडे दिलें. तेंव्हांपासून आजमित्तीपावेतो हें काम शाळाखात्याकडेच आहे. स्वभाषेंतील ग्रंथसंचय

वाढविण्यासाठीं. महाराजांनी किती व कसे प्रयत्न केले आहेत त्याचा उहापोह थोडक्यांत होऊं शकणार नाहीं हें आह्मांस माहीत आहे. परंतु आमचीच लेखनमर्यादा आम्हांस यापेक्षां अधिक लिहूं देत नाहीं. सारांश, श्रीमंत सयाजीराव महाराजांचें कारकिर्दीत राजकीय प्रोत्साहन पूर्ण मिळून महाराष्ट्रसाहित्याभिवृद्धीच्या कोणत्याही प्रयत्नांची उपेक्षा झाली असल्याचें दिसून येत नाहीं.

महाराजांच्या या विद्याव्यासंगांत त्यांनां आरंभीं ज्या अनेक महाराष्ट्रीय विद्वानांच्या व महाराष्ट्रीय साहित्यभक्तांच्या सहवासाचा लाभ झाला त्यांत सुप्रसिद्ध नाटककार कै. शंकर मोरो रानडे हे प्रमुख होत. " हे ता. १ जुलै सन १८८४ रोजीं बडोद्याचें नोकरींत दाखल झाले. तेंव्हांपासून अखेरपर्यंत त्यांनीं ह्या राज्यांत अनेक कामें केलेलीं आहेत. 'ऐनेराजमेहेल' ( राजवाडादर्पण ) हें अत्यंत उपयुक्त पुस्तक त्यांच्याच हातचें आहे. 'वधूवरपरीक्षा' हें पुस्तकही त्यांनीं लिहिलें आहे. श्रावणमासच्या परीक्षा, व दक्षिणा यांचें काम सालोसाल त्यांच्याच हातून झालें आहे. खानगीखात्याचे नियम, वार्षिक रिपोर्ट, स्वारीशिकारींच्या हकीकती वगैरे अनेक लेख त्यांच्या हातचे असून शिवाय प्रत्यक्ष श्रीमंतांशी वाचन, विवेचन वगैरेची नोकरी त्यांनीं केलेली आहे. शंकररावांची स्वभाषासेवेची अत्यंत महत्वाची कामगिरी म्हणजे बडोद्याची 'सहविचारिणीसभा'

होय. ह्या सभेचें उत्पादकत्व व तिची प्रारंभीची कामगिरी ह्यांचें सर्व श्रेय त्यांसच आहे. ह्या सभेचे मार्फत अनेक पुस्तकें व व्याख्यानें प्रसिद्ध होऊन, विद्योद्यमांत वडोदें राजधानीचें नांव पुढें येण्यास शंकररावांचे प्रयत्न बऱ्याच अंशीं कारण आहेत. तशांत श्रीमंत महाराजांसारखें विद्याविलासी प्रभु व त्यांच्या पदरीं शंकररावांसारखे सरस्वतीचे निस्सिम भक्त ह्या अपूर्व योगानें बडोद्यांतील सर्व चळवळीस एक प्रकारचें अत्यंत रमणीय स्वरूप प्राप्त झालें होतें. भोजराजाच्या दरबारीं जशी कालिदासाच्या शिफारसीनें विद्वानांची संभावना व्हावयाची, अशी आख्यायिका आहे, तशी कोणीही विद्वान गृहस्थ बडोद्यास आला कीं, शंकररावांच्या प्रयत्नानें ह्या सभेच्या मार्फत त्याच्या विद्वत्तेची संभावना राजदरबारीं व वटोदरवासी जनांत झाल्याशिवाय रहात नसे. ह्या सभेचें काम नेटानें चालविण्याकरितां त्यांनीं स्वतःच्या सोयीकडे कधींच पाहिलें नाहीं. " *

महाराजांचें साहित्यप्रेम व वाङ्मयोत्तेजन मराठीभाषेपुरतें अथवा बडोद्यापुरतें मर्यादित नाहीं. त्यांनीं पुण्याची ' डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी ', मुंबईचे महाराष्ट्रग्रंथसंग्रहालय इत्यादि महाराष्ट्रीय संस्थांचाच नव्हें तर काशी नागरीप्रचारिणी सभा व हिन्दीसाहित्य संमेलन वगैरे संस्थांचेही आश्रयदाते या नात्यानें परामर्ष घेतला आहे व हा त्यांचा क्रम

* मुजुमदारकृत ' महाराष्ट्रीय नाटककार '.

अद्यापि चालू आहे. गुजराथी भाषेवर तर महाराजांचे अगणीत उपकार आहेत.

**साहित्याभिवृद्धीचे सामुदायिक प्रयत्न**

येथील साहित्याभिवृद्धीच्या सामुदायिक प्रयत्नांचें बरेंच श्रेय पहिल्यानें येथें सन १८९० सालीं स्थापन झालेल्या 'सहविचारणी सभेस' दिलें पाहिजे. हा 'सहविचार' कै. शंकर मोरो रानडे, दि. ब. समर्थ, व कै. खासेराव जाधव या त्रिवर्गांनीं केला आणि आपल्या कारकिर्दीच्या पहिल्या एक दोन वर्षांतच विलासिनी ( राजे ) हिंदुस्थानांतील सर्प (चिपळूणकर) व समाजसुधारणेच्या कित्येक बाजू वगैरे सुमारें पांच पुस्तकें प्रसिद्ध केलीं. परंतु पुढें कांहीं वर्षांनीं येथें दुसरी एक प्रतिस्पर्धी संस्था निघून तिनें या सभेस कांहीं वर्षे रेंगाळावयास लाविलें. ही प्रतिस्पर्धी संस्था ह्मणजे 'ग्रंथसंपादक आणि प्रसारक मंडळी' ही होय. ही मंडळी प्रारंभीं ह्मणजें सन १८९७ सालीं सहविचारणीसभेच्या अंगभूत ह्मणून बडोदें येथें स्थापन झाली व नंतर सन १९०१ सालीं आपलें ठाणें तिनें मुंबईस नेलें. या मंडळीनें आपल्या येथील अवघ्या पांच वर्षाच्या कारकिर्दीत शास्त्रीय विषयावर ४, ऐतिहासिक २, धार्मिक १, ऐतिहासिक कादंबऱ्या ६, चरित्रें २, बोधपर २ व किरकोळ ५ असे २२ ग्रंथ प्रसिद्ध केले. बडोद्यांत असे तों पावेतों मंडळीची एकंदर व्यवस्था सहविचारिणीसभेच्या विद्यमानें चालू होती व

या वेळीं ' मंडळीचे मुख्य काम चिटणीस या नात्यानें रा. सा. शंकरमोरो रानडे यांनीं आपला अमूल्य वेळ खर्च करून उत्कृष्ट रितीनें बजविलें, ' असें मंडळीच्या प्रथम पंचवार्षिक रिपोर्टांत अध्यक्ष श्रीमंत संपतराव गायकवाड यांनी नमूद केलें आहे. या मंडळीच्या कामाविषयीं केसरी कर्त्यांनीं आपल्या ता. १८-२-२९ च्या अंकांत पुढील प्रमाणें अभिप्राय दिला आहे. " आमचे बडोद्याचे व्यवसायबन्धु ' श्रीसयाजीविजय ' कर्ते शेट दामोदर सावळाराम यंदे आणि कंपनी यांचें ग्रंथप्रसाराचें काम आजपर्यंत लोकांस बरेंच पसंद पडलें आहे व पुढें तसेंच अव्याहत चालेल अशी आह्मांस आशा आहे. "

तिसरा प्रयत्न साठेबेलसरे मंडळीचा. या मंडळीनें ' पुढारी' नांवाचें पत्र व ' रंजितरंजकनाटकमाला ' काढली होती. व हिचेंच रूपांतर पुढें ' शेक्स्पीयर नाट्य कथामालेंत ' झालें असावें. परंतु ही मालाही हल्लीं नामशेष आहे.

ही मालाही हल्लीं नामशेष आहे व ग्रंथसंपादक आणि प्रसारक मंडळीही मुंबईस गेली तरी येथील सहविचारिणीसभा साहित्य जागृतीचें काम नेटानें करीत आहे हें तिला भूषणावह आहे—नव्हें—तिच्यांत अलीकडे एक नवजीवन उत्पन्न झालें आहे. या सभेच्या विद्यमानें सन १९०९ सालीं भरलेल्या येथील संमेलनासच ' महाराष्ट्रसाहित्यसंमेलन ' असें व्यापक व सुंदर नांव

दिलें गेलें व त्या नंतर बारा वर्षांनीं ह्मणजे सन १९२१ साली दहावें महाराष्ट्रसाहित्य संमेलन भरवून, येथील महाराष्ट्रभाषाभिमान्यांनीं आपल्या वाङ्मयात्मक चळवळीची आठवण महाराष्ट्र आणि महाराष्ट्रीयांस फिरून एकदां करून दिली. या संमेलनाचे अध्यक्ष रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर यांनीं संमेलन समयीं केलेला बडोदेकरांचा गौरव लक्षांत ठेवण्यासारखा आहे. ते ह्मणतात " पुण्याबाहेर बडोदें एकच असें शहर आहे कीं जेथें महाराष्ट्र साहित्य संमेलनाची पुनरुक्ति झाली. पुण्यास दरवर्षी उन्हाळ्यांत बहुतेक सर्व महाराष्ट्रांतून विद्वान लोक येतच असतात. यामुळें तेथें संमेलन भरविणें ही गोष्ट विशेष महत्वाची नाहीं. पण बडोद्यासारख्या एका बाजूस पडणाऱ्या, व महाराष्ट्रांत समाविष्ट नसलेल्या शहरांत दुसरें वेळीं संमेलन भरणें ही गोष्ट येथील महाराष्ट्राभिमान्यांच्या उत्कृष्ट स्फूर्तीवाचून घडणें शक्य नाहीं. "

पुण्याच्या सार्वजनिक सभेतर्फे होणाऱ्या वसंत व्याख्यानमाले प्रमाणें सहविचारिणी सभाही येथें हेमंव्याख्यानमाला व वक्तृत्वोत्तेजक समारंभ करवीत असते व कांहीं वर्षांपूर्वीं सुरू केलेल्या सहविचारिणीसभापत्रिकेचें तर दोन तीन वर्षांपासून तिनें ' सहविचार ' या सुंदर त्रैमासिकांत रूपांतर करून दिलें आहे, सारांश, संमेलनें भरविणें, व्याख्यानें व वक्तृत्वोत्तेजक समारंभ करविणें व प्रत्यक्ष वाङ्मयनिष्पत्ति करणें, अशा तीन

प्रकारें साहित्य विषयक चळवळींचा पुरस्कार ही सभा करीत असते.

याच सदराखालीं उल्लेख करण्यासारखे येथें आणखीं कांहीं संघ आहेत. त्यापैकीं पहिलेपणाचा मान ' महाराष्ट्रवाङ्मय मंडळाकडे येतो. शोध, लेख संवाद व ग्रंथप्रकाशन या सर्व मार्गांनीं वाङ्मयसेवा करण्याचा या मंडळाचा हेतु असून येथील निवडक साहित्यभक्तांच्या विचारविनिमयानें चाललेल्या या मंडळाचे वरील हेतु पूर्ण होण्याची आशा बाळगणें केव्हांही गैरवाजवी होणार नाहीं. पदार्थविज्ञानशास्त्रांतील ' विद्युत ' या विषयावरील मराठी शब्दकोश याच मंडळीच्या प्रयत्नाचें दृश्य फल आहे.

अशाच प्रकारचा येथील दुसरा संघ ' महाराष्ट्रवाङ्मयसंवर्धकमंडळ ' हा होय. या मंडळाची स्थापना येथें गणेशचतुर्थी ( शके १८४३ ) च्या दिवशीं होऊन कार्यास सुरुवात दसऱ्यापासून झाली. तरुण पिढींत मातृभाषेची जी अनास्था दिसून येते ती नाहींशी करण्याकरितां व होतकरू लेखकांनां उत्तेजन देऊन उपयुक्त विषयांवर ग्रंथ प्रसिद्ध करण्याकरितां ही मंडळी स्थापन झाली आहे ' असें मंडळाच्या प्रथमवार्षिक निवेदनावरून समजतें. रा. भाऊराव पुणेकर हे या मंडळाचे चिटणीस आहेत.

तिसरा संघ ' वार्ताप्रसारकसंघ ' हा होय. या संघामार्फत बडोदें संस्थानांतील विविध चळवळीच्या बातम्या वृत्तपत्रांस पुरविण्यांत येत असतात. शिवाय निरनिराळ्या विषयांवर व प्रचलित राजकारणावरील लेख संघाचे सभासद प्रसिद्ध करीत असतात.

**साहित्यसेवेचे वैयक्तिक प्रयत्न**

महाराष्ट्र साहित्यसेवाविषयक वैयक्तिक प्रयत्नामुळें ज्यांचीं नांवें अर्वाचीन मराठी वाङ्मयांत सुप्रसिद्ध झालीं आहेत अशा येथील साहित्यभक्तांची संख्या अगदींच कमी भरेल असें नाहीं. उदाहरणार्थ कै. शंकर मोरो रानडे व बडोदें राज्यांतील नवसरीचे कै. रामगणेश गडकरी यांनी नाटयलेखनांत, कै. विष्णुगोविंद चिपळूणकर, यांनीं भाषाचिकित्सेंत, कै. नागेश विनायक बापट कादंबरी यांनीं लेखांत, कै. माधव दिवाकर पंडित यांनीं आर्यवैद्यकांत, कै. जनार्दन सखाराम कुडळकर यांनीं ग्रंथालयशास्त्रांत, चंद्रशेखर शिवराम गोऱ्हे यांनीं अर्वाचीन कवितेंत, गोविंद सखाराम सरदेसाई यांनीं इतिहास संशोधनांत, विनायक सदाशिव वाकसकर यांनीं ऐतिहासिक चर्चेत व पूर्वोत्तरपक्ष करण्यांत, दाजी नागेश आपटे यांनीं ज्योतिषांत व समाजशास्त्रांत गणेश सदाशिव भाटे यांनी निबंधलेखनांत, प्रो. माणिकराव आणि व्यायामकर्ते यांनीं शारीर शिक्षणांत मिळविलेले प्राविण्य व केलेली कामगिरी महाराष्ट्रजनतेसमोर प्रत्यक्ष असल्याकारणानें

त्यांच्या विषयीं येथें निराळें लिहिण्याचें प्रयोजनच आह्मांस दिसत नाहीं. ही प्रथम श्रेणींतील मंडळी होत. दुसऱ्या श्रेणींत कवि व लेखक या नात्यानें कै. सीताराम विष्णु देव, कै. नारायण धोंडदेव खांडेकर, जगन्नाथ गणेश गुणे, सीताराम वासुदेव पेंडसे, रामराव मार्तंड भांबुरकर, पांडुरंग रामचंद्र नंदुरबारकर, डॉ. माधव मैराळ सुरतकर, विष्णु धोंडदेव कर्वे वगैरे मंडळी खरोखरीच शोभण्यासारखी आहे. यांची साहित्यसेवाही महाराष्ट्र जाणत आहे.

येथेंच आणखी कांहीं नावें सुचतात. तीं नावें ह्मणजे गोविंद बाबाजी जोशी, भानु केशव गांगनाईक, भिकाचार्य बाळाचार्य ऐनापुरे, वासुदेव नरहर उपाध्ये व व्यंकटाचार्य नरहर उपाध्ये, सखाराम गणेश मुजुमदार, रामचंद्र आबाजी राजे, वासुदेव लिंगोजी बिर्जे, शिवराम गोविंद फाळके, चिंमणराव उर्फ भाऊसाहेब मुजुमदार, विनायक सदाशिव लिमगांवकर, शंकर विष्णु पुराणिक, व डॉ. गंगाधर बाळकृष्ण परांजपे, हीं होत. या पहिल्या अमदानींतील मंडळींची साहित्यसेवाही वाखाणण्यासारखी झाली आहे.

येथील स्त्रीलेखकांची बाजूही सौ. काशीबाई हेर्लेकर यांनीं आणि फक्त यांनींच आजपर्यंत चांगल्या रीतीनें संभाळली आहे. येथेंच पण स्वतंत्रपणें निर्देश करण्यासारखें दुसरें नांव मंगेश

कमळाकर नाडकर्णी यांचे आहे. यांनीं A Short History of Marathi Litdrature हें सुंदर पुस्तक लिहून मातृभाषेची सेवा केली आहे. तिसरें उल्लेखनीय नांव मेजर नानासाहेब शिंदें यांचें आहे. बऱ्याच वर्षांपासून ज्या सफाईनें तरवार त्याच सफाईनें हातीं लेखणी खेळविणाऱ्या नानासाहेबांचें कौतुक कोणास वाटणार नाहीं ?

हें तारे प्रकाशत आहेत तोंच गेल्या दहा बारा वर्षांत येथील साहित्य क्षितिजावर नवीन नवीन तारे चमकूं लागले आहेत. गणेश रंगनाथ दंडवते हे आपल्या अनेक प्रकारच्या सूचींसी व 'प्रगति' इत्यादि पुस्तकांनीं महाराष्ट्रीयांच्या चांगल्या परिचयाचे आहेत. भगवंत बळवंत पाळेकर हे मराठा समाजांत करीत असलेली 'जागृति' सर्वांस माहीत आहे आणि भास्कर विनायक देवास्कर हे होतकरू कवीही आनंदाच्या बालवाचकांस अपरिचित नाहींत. सारांश, अवघ्या चाळीस वर्षांत सुमारे चाळीस ठळक ठळक महाराष्ट्र साहित्यभक्त निर्माण करण्याचें श्रेय बडोद्यानें खात्रीनें संपादन केलें आहे.

निरनिराळ्या नियतकालिकांतून लेख लिहून मातृभाषेची सेवा करणाऱ्या येथील साहित्यभक्तांची संख्या तर बरीच मोठी होईल. अशा साहित्यभक्तांत वरील विद्यमान लेखकांखेरीज प्रो. चिंतामण विनायक जोशी. प्रो. नारायय काशिनाथ आपटे, प्रो. भालचंद्र चिंतामण लेले, प्रो. वि. के. भागवत, वासुदेव विनायक

जोशी, एस. के. सुधाळकर, प्रो. शि. वि. शेवडे, शं. गो. डोंगरे, ह. मा. सहस्रबुद्धे, स. वि. देशपांडे, शं. ग. सप्रे, गो. मा. भवाळकर इत्यादि लेखक व पां. वै. गुप्ते ( सुंदर माधव ) वगैरे कवि प्रमुख आहेत.

येथील मराठी साहित्य वर्धनांत ज्यांनीं प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष बहुमोल मदत केली आहे व यामुळें ज्यांचा उल्लेख केल्यावांचून हें विवेचन अपूर्ण राहील अशा कांहीं नांवांचा शेवटीं परंतु येथेंच निर्देश करणें जरूर आहे. आणि तीं नांवें ह्मणजे श्रीमंत संपतराव गायकवाड, दि. ब. समर्थ, मे. खासेराव साहेब जाधव व कै. कृष्णरावं विनायक शारङ्गपाणी हीं होत. येथील महाराष्ट्र साहित्य या थोर मंडळींचे फार ऋणी आहे.

आतां बडोद्याच्या साहित्याची जी सूची आह्मीं पुढें देणार आहों व ती देतांनां आह्मीं आपणास ज्या नियमानें बांधून घेतलें आहे, त्याविषयीं दोन शब्द लिहिणें अवश्य आहे. तो नियम ह्मणजे जीं पुस्तकें प्रत्यक्ष बडोद्यांत प्रसिद्ध झालीं आहेत अथवा ज्यांच्या प्रकाशनांत बडोद्याचें प्रत्यक्ष अंग आहे अशींच पुस्तकें आह्मीं या सूचींत समाविष्ठ केलीं आहेत, हा होय. ह्मणजे ग्रंथकार येथें रहात असूनही त्याचीं बाहेर प्रसिद्ध झालेलीं पुस्तकें आह्मीं या आढाव्यांत जमेस धरलीं नाहींत. उदाहरणार्थ, सौ. काशीबाई हेर्लेकर यांच्या ' संसारांतल्या गोष्टी , वि. स. वाकसकर यांचें ' राधेयकर्ण चारित्र' , गो. स. सरदेसाईकृत

कांहीं इतिहास, सी. वा. पेंडसेकृत ' रसतरंगिणी ', सप्रेकृत ' जुजुत्सु ', ' मल्लखांब ' व ' फरीगदगा ', चं. शि. गोऱ्हेकृत ' अर्वाचीन कविता ', मा. मै. सुरतकरकृत ' जठरशुद्धि ' ' दुग्धप्राशनोपचार ' व ' प्राणायामशास्त्र ', ग. स. भाटेकृत ' वाचन, त्याचे मार्ग व उद्दिष्ट ', श्री. भाऊसाहेब मुजुमदार यांचा ' गुजराथचा समशेर बहादूर ' व इतर पुस्तकें आह्मीं या सूचींतून वगळलीं आहेत. प्रत्यक्ष जरी नाहीं तरी पर्यायानें अशा पुस्तकांचें कर्तृत्व बडोद्याकडेच येते. व मुख्य यादींत आमच्या नियमाप्रमाणें जरी देतां आलीं नाहींत तरी तीं येथें मुद्दाम उल्लेखिलीं आहेत. राजाज्ञेनें तयार झालेलीं पुस्तकें मग तीं कोठेंही छापलीं असोत; येथेंच प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांत गणलीं आहेत.

राजाज्ञेनें तयार झालेलीं पुस्तकें विद्याधिकारी कचेरींत व सयाजी साहित्यमालेंतील पुस्तकें येथील कापडी पोळेंत एम. सी. कोठारी यांच्याकडे विकत मिळतात. नारायण चिंतामण आठवले व नरहरीपुस्तकालय हीं रावपुऱ्यांतील दोन पुस्तक विक्रीचीं जुनीं दुकानें प्रसिद्ध आहेत. अलीकडे पोटभरे ॲन्ड सन्स हेही पुस्तकविक्री करीत असतात. या शिवाय मेसर्स जोशी व गाड-गीळ यांचीही किरकोळ पुस्तकविक्री चालत असते.

साहित्य विषयक चळवळ करीत असतां साहित्यपोषक अशा दुसऱ्या महत्वाच्या चळवळीकडे बडोद्याचें दुर्लक्ष झालें

२८८५

आहे, असें नाहीं, त्यानें या चळवळीप्रमाणेंच अखिल भारतीय संगीत परिषद, मराठाशिक्षण परिषद, जैन कॉन्फरन्स व आर्य-समाज परिषद, वगैरे सारख्या परिषदा व प्रदर्शनें भरवून, शिक्षण, सामाजिक व औद्योगिक चळवळींचाही पुरस्कार केला आहे व करीत आहे.

आतां शेवटीं परिशिष्ट दोन वरून काय निष्पन्न होतें याचें विवेचन करूं. हें परिशिष्ट बडोदें येथील मराठी साहित्याच्या विषयावार सूचीचें आहे. ह्यांत पहिलें सदर सर्वसाधारण ग्रंथांचें ह्मणजे कोश, संदर्भग्रंथ वगैरे ग्रंथांचें आहे. परंतु ह्या सदरावरून येथें एकही मराठी कोश ग्रंथ तयार झाला असल्याचें दिसून येत नाहीं. ह्या सदरांतील आठ पुस्तकांपैकीं सहा पुस्तकें संदर्भ-ग्रंथाचीं, एक ग्रंथालय शास्त्रविषयक व एक सामान्य स्वरूपाचें आहे. आणि या प्रमाणें कोशांची उणीव संदर्भ ग्रंथांनीं भरून काढली आहे. आजपर्यंत आपणाकडे वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें व इतर उपयुक्त व वाचनीय पुस्तकें यांची विश्वसनीय व पद्ध-तशीर माहिती देणारे ग्रंथ उपलब्ध नव्हते. परंतु येथील सेंट्रल लायब्ररीच्या विद्यमानें तयार झालेल्या या संदर्भ ग्रंथानीं या विष-यावरील साहित्याची उणीव नाहींशी झाली आहे.

दुसरें सदर अध्यात्म व तत्वज्ञान विषयक ग्रंथांचें आहे. ह्यांतील अभ्यंकर व चांदोरकृत ‘ शांकरब्रह्मसूत्राचें मराठी भाषां-तर चार भाग फार महत्वाचे व हल्लीं दुर्मिळ झाले आहेत.

केळुसकर आणि रानडे यांचीं उपनिषदें, चापेकर यांचा ज्ञानयोग, वगैरे नऊ पुस्तकांपैकीं आठ पुस्तकें उत्कृष्ट आहेत.

तिसरें सदर धर्म, या सदरांत प्रसिद्ध झालेलीं बहुतेक पुस्तकें श्रीमंत महाराज साहेब यांच्या आज्ञेनें तयार झालेलीं असल्यामुळें त्यावरून समाजाची सर्वांगीण सुधारणा होण्याविषयीं महाराजांनीं किती आस्थापूर्वक प्रयत्न केले आहेत हें चांगलेंच निदर्शनास येतें. यांतील आन्हिककर्म प्रकाश, पंचमहायज्ञविधि, संस्कार कौस्तुभ, लग्नविधि व सोहळे, आचारमयूख व प्रायश्चित्तमयूख, दत्तकचन्द्रिका, दानचंद्रिका व नीतिविवाहचंद्रिका, उपनयनविधिसार, विवाहविधिसार, अंत्येष्टिविधिसार व श्राद्धविधिसार वगैरे पुस्तकांनीं धार्मिक वाङ्मयांत उत्कृष्ट भर घातली आहे.

चौथें सदर नीति. यांतील खांडेकर यांचें ‘ नीतिवाक्यामृत ’, दंडवते यांचे ‘ प्रगति ’ व सरदेसाई यांचा ‘ राजधर्म ’ वगैरे पुस्तकें महत्वाचीं आहेत.

पांचवें सदर शास्त्र व विज्ञान. ह्यांतील गोखले यांचें ‘ शारीरशिक्षण ’, चिपळूणकर यांचें ‘ हिंदुस्थानांतील सर्प ’ जोशीकृत ‘ हस्तिविज्ञान ’, दामलेकृत ‘ सृष्टिशास्त्र ’, परांजपेकृत ‘ आहारमीमांसा ’ व ‘ रोग्याची शुश्रषा ’, मोडककृत ‘ पदार्थविज्ञान शास्त्राचीं मूलतत्वें ’ इत्यादि पुस्तकें उपयुक्त आहेत.

सहावें सदर समाजशास्त्रें. या सदरांत अलोनीकृत 'धर्मशास्त्राचीं मूलतत्वें', आपटेकृत 'सुधारणा व प्रगति' कवठेकरकृत 'अर्थशास्त्र' पवार व गोगटेकृत 'नागरिकांचीं कर्तव्यें' नेनेकृत 'भारतीयशासनपद्धति' इत्यादि पुस्तकें वाखणण्यासारखीं आहेत.

सातवें सदर कला व हुन्नर यांचें आहे. यांतील कदम, गांगनाईक व मराठे यांचें पाकशास्त्रावरील ग्रंथ, चिपळूणकरकृत 'शरीरशिक्षण' देवधरकृत 'मराठी खेळांचें पुस्तक', परांजपेकृत 'गृहिणी शंकानिरसन', पुणेकरकृत 'अभिनयदर्पण', वसईकरकृत 'सनईवादनपाठमाला', माणिकराव व मुजुमदारकृत व्यायामविषयक ग्रंथ आणि राजेकृत 'कृषिकर्मविद्या' वगैरे पुस्तकें संग्राह्य आहेत.

आठवें सदर गद्य वाङ्मयाचें आहे. यांतील इसलामपूरकरकृत जैनकवि अमरचंद्र याच्या 'काव्यकल्पलता' या पुस्तकाचें मराठी भाषांतर फारच महत्वाचें आहे. कविता शास्त्रावरील हा जैनग्रंथ केवळ अपूर्व असून या शास्त्रांत प्राविण्य मिळवूं इच्छिणारांनींच नव्हें तर सामान्य वाचकांनींही एकदां हा ग्रंथ अवश्य अवलोकन करण्यासारखा आहे. उपाध्ये यांच्या विचार-रत्नाकरास तर आपण मराठी बेकनच ह्मणूं. याच सदरांतील पेंडसेकृत 'संस्कृत वाङ्मयाच्या इतिहास' पारनाईककृत 'वक्तृत्वकला'

व कुंडाळकर यांचा बालवाङ्मयावरील निबंध वगैरे पुस्तकेंही महत्वाचीं आहेत.

नववें सदर काव्य ग्रंथांचें. ह्यांतील खांडेकरांचा 'कविता कलाप', कुवलयानंदांचीं गाणीं, गोऱ्हे यांचा रंगराव हर्षे व चिंतोपंत उदास, नंदुरबारकर यांच्या 'उत्साहलहरी' आणि पेंडसे व भांबुरकर यांचे ग्रंथ सुंदर आहेत.

दहावें सदर नाटकांचें. यांत नांव घेण्यासारखें अथवा नांवाजलेलें असें एकही नाटक येथें प्रसिद्ध झालेलें दिसत नाहीं.

अकरावें सदर कादंबऱ्यांचें आहे. या सदरांत सुमारें बावीस पुस्तकें प्रसिद्ध होऊन त्यांतील सुमारें वीस पुस्तकें वाखाणण्यासारखीं झालीं आहेत. इंदारकर यांची 'भामिनीभूषण' कर्वे यांची 'सति राणकदेवी', देवांची 'विषवृक्ष' धनुर्धारी यांची 'वाईकर भटजी', मांडे यांची 'माधवी कंकण', पुराणिक यांची 'देवी सत्यभामा', फाळके यांची 'दुर्गेशनंदिनी', बापट यांची 'पानपतची मोहीम', भांगले यांची 'आनंदाश्रम' व राजे ' यांची विलासिनी' इत्यादि कादंबऱ्या लोकप्रिय आहेत.

बारावें सदर इतिहासाचें आहे. या सदरांत ३२ ग्रंथ तयार होऊन त्यांनीं मराठी ऐतिहासिक वाङ्मय चांगलेंच समृद्ध केलें आहे. यांतील बरेच ग्रंथ राष्ट्रकथामालेंतील असून हे ग्रंथ तयार करविण्याचें सर्व श्रेय श्रीमंत महाराजसाहेब यांसच आहे. नवीन

पुस्तकांपैकीं शिंदे यांचा ' हिंदुस्थानचा लष्करी इतिहास ' व ' मराठ्यांच्या प्रसिद्ध लढाया ' हीं पुस्तकें वाखाणण्यासारखीं आहेत. सरदेसायांचे इतिहासग्रंथ तर या सदराचें शिरोभागींच ठेवले पाहिजेत.

तेरावें सदर भूगोल व प्रवास वर्णन ग्रंथाचें आहे. यांतील जोशी, मुजुमदार व माने पाटील यांची प्रवास वर्णनें उल्लेखनीय असून धनुर्धारी यांचा ' हिंदुस्थानचा व्यापारी भूगोलही ' महत्वाचा आहे.

चौदावें सदर चरित्रग्रंथाचें. यांतील आपटे यांचें 'मीरांबाई', केळकर यांचें ' ग्यारिबल्डीचें चरित्र ', गोत्रीकृत ' श्रीसयाजीराव महाराजांचें चरित्र ', परांजपेकृत ' बडोद्याचे राज्यकर्ते ', पेंडसेकृत ' शिवाजी ', भागवतकृत ' थोरले सयाजीराव महाराजांचें चरित्र ', भांबुरकरकृत ' अब्राहामलिंकन ', मुजुमदारकृत श्री. महाराणी जमनाईसाहेब यांचें चरित्र, इत्यादि चरित्रें उत्कृष्ट आहेत.

**उपसंहार.** आतां एकंदर मराठी वाङ्मयाशीं बडोद्याच्या मराठी साहित्याची तुलना केली असतां काय निष्पन्न होतें हें पाहून विषयाचा समारोप करूं. मराठी भाषेची एकंदर ग्रंथसंपत्ति दहा हजार. या दहा हजार पुस्तकांपैकीं चांगल्या अशा दोन हजार पुस्तकांची यादी तयार करतां आली तर त्या यादींत दोनशे पुस्तकें बडोद्याच्या साहि-

त्याची समाविष्ट केली जातील हें आह्मीं खात्रीनें सांगू शकतो. अर्वाचीन महाराष्ट्र साहित्याच्या घटनेंत बडोद्यानें घेतलेला भाग मोठा व फार महत्वाचा आहे हें कोणीही नाकबूल करणार नाहीं.

तथापि श्रीमंत महाराज साहेबांचा आधार नसता, मातृ-भाषेच्यां व एकंदर हिन्दी भाषांच्या उन्नतीचा त्यांनीं जणो काय विडाच उचलला नसता तर मराठी साहित्यांत बडोद्यास आज जें गौरवाचें स्थान प्राप्त झालें आहे तें केव्हांही प्राप्त न होतें. बडोदें महाराष्ट्रांत मोडत नाहीं. तथापि इंदूर, ग्वाल्हेर, धार देवास वगैरे मराठी संस्थानापेक्षां महाराष्ट्राच्या तें बरेंच जवळ आहे व या मुळें पुण्यामुंबईस होणाऱ्या साहित्य व शिक्षण विषयक सर्व चळवळींचा परिणाम इतर मराठी संस्थानापेक्षां बडो-द्यावर पहिल्यानें होतो. व बडोदेही महाराष्ट्राच्या या आदेशास आजपर्यंत उत्तम प्रत्यादेश देत आलें आहे ही गोष्ट बडोद्यास खरोखरीच भूषणावह आहे. अनंतफंदीनीं कै. श्रीमंत फत्तेसिंह राव महाराजांवर पोवाडा करतांनां पुणें व बडोदे यांची तुलना केली आहे. ही तुलना जशी शंभर वर्षापूर्वी समर्पक होती तशी एखाद्या आधुनिक शाहिरानें हल्लीच्या पुणेबडोद्यावर कवन केल्यास त्यालाही अनंतफंदी सारखेच पुणेबडोद्याच्या हल्लीच्या साम्याचे अनेक समर्पक दाखलें देतां येतील यांत मुळींच संशय नाहीं.

शेवटीं, बडोद्याच्या इतर अनेक चळवळींप्रमाणें बडोद्याच्या महाराष्ट्र साहित्याभिवृद्धीच्या प्रयत्नांत ज्यांचें प्रोत्साहन कारणीभूत झालें आहे. त्या प्रस्तुतच्या श्रीमंत सयाजीराव महाराज व श्रीमंत मातोश्री महाराणी चिमणाबाई साहेब गायकवाड या उभयतांस अंतःकरणपूर्वक दीर्घायुष्य चिंतून बडोद्याच्या मराठी साहित्याचें हें अल्प विवेचन येथेंच पुरें करतों.

# बडोद्याचें मराठी साहित्य व साहित्यभक्त.

## परिशिष्ट १.

### सर्व साधारण.

आचार्य व शिंगणे.

माझें प्रियपुस्तक अथवा व्यवहारदर्पण.

दंडवते, गणेश रंगनाथ.

भारत नियत कालिक दीपिका. १९१५

मराठी ग्रंथलेखकांची सूचि. १९२१

महाराष्ट्र नियतकालिक दीपिका. १९२२

सेंट्रल लायब्ररी, बडोदें.

मराठी पुस्तकांसाठी वर्गीकरण पद्धति. १९१६

मराठी पुस्तकांचा कर्तावार कॅटलॉग. १९१९

मराठी पुस्तकांचा नामानुक्रमवार कॅटलॉग. १९२१

मराठी पुस्तकांचा विषयवार कॅटलॉग. १९१७

मराठी पुस्तकांचा विषयवार कॅटलॉग. ( पुरवणी ) १९२४

### अध्यात्म व तत्वज्ञान.

अभ्यंकर आणि चांदोरकर.

शांकर ब्रम्हसूत्राचें मराठी भाषांतर भा. १ ते ४ १९११

केळुसकर आणि रानडे.

उपनिषदें भा. १-२ १८९९-१९०६

चापेकर, श्री. नि.

ज्ञानयोग. १९०३

दामले, मोरो केशव

न्यायशास्त्र.

वर्तक बाळकृष्ण पांडुरंग.

परमार्थ प्रवेश. १८९८

## हिंदु-धर्म.

अलोनी, नारायण केशव.

धर्म शास्त्रांची मूलतत्वें. १९०५

लग्नविधि व सोहळे. १९०४

उपाध्याय, व्यंकटाचार्य नरहर.

संस्कार कौस्तुभ, १९१४

ऐनापुरे, भिकाचार्य बाळाचार्य.

आचारमयूख १९०५

प्रायश्चित्त मयूख १९१४

छत्रे, आ. मो.

भागवत दशम ( पूर्वार्ध ) शक १८११

जडे, रामचंद्र विश्वंभर.

शिक्षण विषउतार १८९७

जोशी, ना. गो.

आन्हिककर्म प्रकाश. १९१७

दानचंद्रिका.

देशपांडे, गोपाळ नरसिंग.

सुबोध प्रार्थना स. १९३०

नाडकर्णी, मंगेश कमळाकर

अंत्येष्टिविधिसार.

विवाहविधिसर १९१३

नीतिविवाहचंद्रिका. १८८७

पंच महायज्ञविधि ( मराठी भाषांतरासह ) १८९७

फडके, सीताराम महादेव.

सगुणोपासना. १९२०

बापट, वि. वा.

आनंद रामायणसार १९०४

भाटवडेकर, विष्णु कृष्ण.

हिंदुधर्म शास्त्र भाग १–२ १९०५

रानडे, शंकर मोरो.

ऐने राजमहाल.

वधूपरीक्षा. १९०३

वैद्य, वामन रावजी.

श्रीगुरुलीलामृत १९१४

शास्त्री, अ. ना.

उपनयन विधिसार १९१६

श्राद्ध–विधिसार.

सुरतकर, कृ. य.

दत्तकचंद्रिका

## हिंद्वेतर-धर्म

राजवाडे, चिंतामण वैजनाथ.

दीघनिकाय. १९१८

## नीति.

कदन, ह. ल.

व्यवहारोपयुक्त वाकमंजिरी. १८९९

केळुसकर, कृष्णाजी अर्जुन.

सेनेका व एपिक्टेटस यांची बोधवचनें १८९८

खांडेकर, नारायण धोंडदेव

नीतिवाक्यामृत १८९१

चिपळूणकर, दा. गो.

सद्वाक्यकथा संग्रह १८९५

सद्वाक्यरत्नमाला. १८९३

दंडवते, गणेश रंगनाथ

प्रगति. १९१७

सुलभशिक्षण. १९१८

देव, गोविंद विष्णु.

विदुरनीतिसार. भा. १ ते ४ १८९५

पंडित, ना. भा.

व्यवहार चंद्रिका १८९०

पवार, डॉ. बा. बा.

तरुण मुलांस उपदेशपर व्याख्यानें १९०४

बेंजामिन, सिमियन.

मार्कस ऑरेलिअस बादशहाचीं बोधवचनें

मराठे ग. रा.

आईबाप आणि मुलें ह्यांचे परस्पर धर्म १९०७

मुलांचे कानांत ( तरुणांस वीर्य रक्षणासंबंधी उपदेश )

वर्तक, बाळकृष्ण पांडुरंग.

बालधर्म १८९८

शिंदे व सावंत.

शिस्त १९१८

सरदेसाई गोविंद सखाराम.

राजधर्म १८९०

## शास्त्र व विज्ञान.

गांगनाईक, भानु केशव.

घर व त्याच्या भोवतालची जागा

गुर्ते, रा. स.

गजपरीक्षा १८९३

गोखले, नीलकंठ गणेश.

शारीरशास्त्र व आरोग्यशास्त्र १९२४

चापेकर, ग. वि.

प्रमदागदारि

चिपळूणकर विष्णु गोविंद.

हिंदुस्थानांतील सर्प १८९३

जोग, वि. रा.

वैद्यराज अथवा रोगनिवारण १९०१

जोगळेकर, द. रा. आणि संत, कृ. रा.

आहारशास्त्र प्रवेश १९२४

जोशी, महादेव मुकुंद.

हत्तींचें प्रजननासंबंधी माहितीचा रिपोर्ट १९०७

हस्ति विज्ञान १९१०

टाकळकर, अनंत बाळकृष्ण

रचनात्मक भूमिति १९२३

तांबे गो. रा.

आरोग्य शास्त्र १८८९

दातार, सदाशिव नारायण.

सजीव सृष्टीची उत्क्रांति [illegible]

दामले, मोरो केशव

सृष्टि शास्त्र भाग १ व २

धुरंधर, कृष्णराव विश्वनाथ.

आरोग्यशास्त्र

पंडित, जगन्नाथ प्रभाशंकर.

प्रत्येक मनुष्य स्वतः वैद्य १९१४

परांजपे, गंगाधर बाळकृष्ण

आहार मीमांसा १८९८

रोग्यांची शुश्रूषा १९०१

**भाटवडेकर भालचंद्र कृष्ण.**

वनस्पति शास्त्राचीं मूलतत्वें

**महाराष्ट्र वाङ्मयमंडळ.**

विद्युत या विषयावरील शब्दकोश १९२३

**मोडक, बाळाजी प्रभाकर.**

पदार्थविज्ञान शास्त्रांचीं मूलतत्वें

**रोशिमवाला डॉ. पी.**

जीवनरसायनशास्त्राच्यां मूलतत्वांचें सं. वर्णन १९११

**वैद्य, गोविंद अमृत.**

लसोपचारपद्धति मीमांसा १९१५

## समाज-शास्त्र

**आपटे, दाजी नागेश.**

सुधारणा आणि प्रगति १९२१
पार्लमेंट १९२३

**आपटे, वासुदेव गोविंद.**

बलोद्यानपद्धतीचें गृहशिक्षण १९२८

**उपाध्ये वासुदेव नरहर**

प्रत्यंत देशगमन मीमांसा १८९२

**कवठेकर, विठ्ठल लक्ष्मण**

अर्थ-शास्त्र

**गुर्जर आणि चापेकर.**

हिंदुस्थानची राजनिति १९०१

गोगटे, कृ.

नागरिकांचीं कर्तव्यें. १९२३

गोखले, रामचंद्र हरि

गुन्हा व त्यांची कारणें

जोशी, चिंतामण विनायक

इंग्रजी शिष्टाचार. १९२३

नेने विष्णु पांडुरंग.

भारतीय शासनपद्धति. १९२३

पंडित, प्रभाकर रामचंद्र.

अपभ्रष्ट चंद्रिका.

पवार, रामचंद्र रावजी.

नागरिकांची कर्तव्यें.

फळणीकर र. ब. आणि दीक्षित ग. के.

समासप्रकरण. १९२४

फाळके, शिवराम गोविंद.

इंग्लंडांतील राज्यकारभार व्यवस्थेच्या इतिहासाचीं मुलतत्वें.

बोडस महादेव राजाराम.

प्राच्य व पाश्चात्यदेशांतील ग्रामसंस्था.

वैद्य, चिंतामण विनायक.

अबलोन्नति लेखमाला. १९१७

शिंदे, नानासाहेब.

मराठा समाजांतील कांहीं घातुक चाली. १९३१

मराठी ग्रंथ संग्रहालय १८०७ नं. ता. ठाणे.

सनाढ्य, तोताराम.

फिजी बेटांतील माझीं २१ वर्षें. १९१५

## कला व हुनर.

आंठवले, रामकृष्ण सखाराम.

कमानचेंडूचा खेळ ( क्रोके )
कुबडीचेंडू ( गॉफ )
चेंडूदांडूचा खेळ ( क्रिकेट )
चौरंगगोट्याचा खेळ ( बिलियर्ड्स )
झेलचेंडू ( लॉन्टेनिस )

कदम, नामदेव रा.

अन्नपरिवेषण १९१६
टेबलसर्विस. १९१६
पाकशिक्षण. १९१६
बंगाली तऱ्हेचे पदार्थ. १९०९
भोजनदर्पण. १८९७
सयाजीपाकरत्नाकर. १९१७

गांगनाईक, भानु केशव.

पाश्चिमात्यपाक विज्ञान.

गुप्त, र. भ.

जड-जोडी.

चिपळूणकर, विष्णु गोविंद.

शारीरशिक्षण. १८९३

जोगळेकर, कृ. म.

घोडा-गाडी. १८९७

दाते, मा. व्य.

युवराजाचा बुद्धिबळाचा खेळ.

दाते, वि. स.

बुद्धिबल डावसंग्रह. १८८९

देवधर, अनंत बाबाजी.

मराठी खेळांचें पुस्तक ( सचित्र ) १९०५

परांजपे, केशव बाळकृष्ण.

गृहिणीशंकानिरसन

पुणेकर, केशव भगवंत.

अभिनयदर्पण. १९०१

फाळके, शिवराम गोविंद.

घरांत खेळण्याचे खेळ. १९००

बापट, सदाशिव गणेश.

सतारशिक्षक. १९१५

मराठे, बळवंत रामचंद्र.

सूपशास्त्र भाग १—२ १८८१

मनोहर शिवराम स.

शाकुंतल नाटकाचें नोटेशन. १९००

शापसंभ्रम नाटकाचें नोटेशन. १९०१

माणिकराव, गजानन यशवंत.

खंडेराव महाराज व बडोद्यांतील मल्लविद्या १९१८

पोटाचे व्यायाम.

**मिरजसंस्थानाधिपति.**

भीमसेनी कुस्ती भाग १–२

**मुजुमदार, दत्तात्रय चिंतामण.**

हलकी जोडी भाग १

**राजे, रामचंद्र आबाजी.**

कृषिकर्मविद्या.

**वसईकर, गणपत पी.**

सनईवादनपाठमाला भाग १ २ १९१८

**विद्वांस, धोंडो केशव.**

मल्लखांब भाग १

**वैद्य, गजानन भास्कर.**

रेखात्मक यथादर्शन चित्रविद्या. १९१५

**शाह, केशवलाल पु.**

लाठी. भाग १

**सरदेसाई, गोविंद सखाराम.**

अंधक ( मागन्स )

उताणा रुपाया ( पिच अँड टॉस )

विझिक.

मुद्रापरिवर्तन

**सहस्रबुद्धे, ह. मा.**

हनुमंतीकुस्ती भाग १-२

**सेंट्रल लायब्ररी, बडोदें.**

मुलांसाठीं बैठकीचे खेळ. १९२०

## गद्यवाङ्मय ( अहवाल, निबंध भाषणें वगैरे )

इसलामपूरकर, वामनशास्त्री.

काव्यकल्पलता. १८९१

उपाध्यें, वासुदेव नरहर.

विचाररत्नाकर.

सुधारणा म्हणजे काय ? १८९३

कुडाळकर, जनार्दन सखाराम.

बालवाङ्मय.

ग्रंथसंपादक आणि प्रसारक मंडळी.

प्रथमपंच वार्षिक रिपोर्ट. १९०१

गायकवाड, श्रीमंत संपतराव.

स्वातंत्र्य.

जोशी, चिंतामण विनायक.

अडीच हजार वर्षांपूर्वीचा समाज.

तांबे, गणेश कृष्ण.

नशीब आणी उद्योग १८९४

तांबे, गोपाळ रामचंद्र.

पाण्याचा आरोग्यशास्त्रदृष्ट्या विचार.

दंडवते, गणेश रंगनाथ.

अर्वाचीन मराठी वाङ्मय ( १८५७–१८८५ ) १९२४

नवलकर, ह. ना.

गर्भपरिहार.

पारनाईक, लक्ष्मण त्र्यंबक.

वक्तृत्वकला.

पाळेकर, भगवंत बळवंत.

नव्या मनूतला मराठा. १९२१

निवडक निबंध. १९१४

पेंडसे, सीताराम वासुदेव.

गद्यसुमनहार. १९१२

संस्कृतवाङ्मयाचा इतिहास. १९१५

महाजनी, विष्णु मोरेश्वर.

रामायणकालीन लोकस्थिति.

राडेके, श्री जनाबाई.

स्त्रियांची सामाजिक कर्तव्यें. १९१४

सहविचारिणीसभा.

सहाव्यामहाराष्ट्र साहित्य संमेलनाचा अहवाल १९१०

दहाव्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचा अहवाल. १९२३

सरदेसाई, गोविंद सखाराम.

मराठी शाहींतील गद्यरचना.

## काव्य.

खांडेकर, नारायण धोंडदेव.

कविताकलाप. १९१०

गायकवाड, श्री. संपतराव ( संपादक )

भजनकुसुममाला. १९२०

**गुणे, जगन्नाथ गणेश.**
कुवलयानंदाचीं गाणीं. १९१७

**गोऱ्हे, चंद्रशेखर शिवराम.**
रंगराव हर्षे व चिंतोपंत उदास. १९२३

**तट्टू, यशवंत ना.**
अक्षक्रीडा. १९०९

**दत्तात्रेय.**
भगवद्गीता भजन प्रभाती. १८८८

**नंदुरबारकर, पांडुरंग रामचंद्र.**
उत्साहलहरी. १९२३

**पेंडसे, सीताराम वासुदेव.**
काव्यकलिका गुच्छ. १९१८
पद्यसुमनांजलि. १९१७
शिशुसंमेलनोत्सवकाव्य. १९१[illegible]

**भांबुरकर, रामराव मार्तंड.**
मराठी भाषेचा महिमा १९१५
सयाजीराज्यशासनपद्धति. १९१६
सयाजीवृत्तरत्नमंजूषा. १९२२

**राशिनकर, यशवंत सखाराम.**
भजनामृत. १९२३
विश्वरूप दर्शन. १९२१
सुवाक् पुष्पमाला. १९१९

**वासुदेवानंद सरस्वति.**
दत्तपंचपदी. १९१३

देऊ, विष्णु सीताराम.
विषवृक्ष. १९०२
' धनुर्धारी '
वाईकरभटजी. १८९८
पंडित, कें. मो.
गोभागणेश पितळी दरवाजा यांचें लहानसें आत्मचरित्र शा.१८२६
' पक्की ठेंच लागली ' अथवा शेवट तर गोड झाला. १९०१
पांडे, आ. आ.
माधवीकंकण १९०८
पुराणिक, शंकर विष्णु.
देवी सत्यभामा
बापट, नागेश विनायक
पानपतची मोहीम. १८९७
फाळके शिवराम गोविंद.
दुर्गेशनंदिनी.
भागले, धो. ज.
आनंदाश्रम. १८९८
मटंगे, ह. पु.
बकुलपुष्पमाला. १८९६
मुजमदार, चिंतामण नारायण.
राणा हमीर. १९२४
मुजुमदार, सखाराम गणेश.
वारुणी आणि विश्वशोषिता. १८९१

राजे, रामचंद्र आबाजी

विलासिनी.

लिमगांवकर विनायक सदाशिव.

शरश्चंद्र आणि कुमुदिनी.

सुंदराव आणि मनोरमा.

वीरमती. १८९६

सदानंद अथवा समाजसेवा. १९१४

## इतिहास.

आंबेगांवकर, नी. का.

कोरलचा प्राचीन संक्षिप्त इतिहास. १९१०

आठवले, रामकृष्ण सखाराम.

स्पॅनिशमूरलोकं. १८९३

ओक, विनायक कोंडदेव.

रोम. १८९६

काथवटे नागेश आबाजी.

कोर्थेज. १८९५

कुळकर्णी, ना. पां.

गोपगडमणि १८९७

कीर्तिकर, कान्होबा रणछोडदास

रशिया.

केळुसकर, कृष्णाजी अर्जुन

फ्रान्सचा जुना इतिहास १८९३

गायकवाड, सीताराम रामचंद्र.

आसिरीया.

धोंड, साजो कृष्ण.

आथेन्सचें साम्राज्य. १९०९

ग्रीसचा इतिहास. १८८०

देव, बळवंत.

मल्हारराव महाराजांचा खरा इतिहास.

नातू, वि. र.

रशिया.

पंडित, भास्कर नारायण.

बडोदें राज्याचा बालबोध इतिहास. १९१५

मराठी ग्रंथ संग्रहालय नं. ता. ठाणे

पावगी, रावजी, भवानराव.

तुर्कस्तान. १८९३

पुराणिक, शंकर विष्णु.

इराण. १८६३

पेंडसे, सीताराम वासुदेव.

बडोदें राज्याचा इतिहास. १९१९

बोडस, महादेव राजाराम.

आर्यांची ग्राम पद्धति.

बेलवलकर, हरि सदाशिव.

जर्मनी. १८९४

भोसले, बा. के.

जंजिरा संस्थानचा इतिहास.

मुजुमदार, सखाराम गणेश.

सावशेष साम्राज्य भाग. १ १८९७

रांगणेकर, केशव मंगेश.

इंग्रज लोकांचा संक्षिप्त इतिहास. १९२२

लेले, गणेश अनंत.

रोम व कार्थेज. १८९४

वैद्य, गो. अ.

गायकवाडी राज्याचा संक्षिप्त इतिहास. १८८९

शिंदे, नानासाहेब.

मराठ्यांच्या प्रसिद्ध लढाया.

हिंदुस्थानचा लष्करी इतिहास.

शिवदिग्विजय ( बखर ) श. १८१७

शिवजीप्रताप ( बखर )

सरदेसाई, गोविंद सखाराम.

इंग्लंडदेशाचा विस्तार.

ग्रीसदेशाचा सं. इतिहास.

हिंदुस्थानचा अर्वाचीन इतिहास. भा. १-२-३

## भूगोल, प्रवास व स्थलवर्णन.

केळकर, नरहर अनंत.

भूतलविद्या व भूगोलविद्या. १९११

खासगीवाले, जो. भा.

दसऱ्याचें सोनें अथवा विलायतची सफर. १८९५

चिपळूणकर, विष्णु गोविंद.

मृगयाकुतूहल. १९०७

जोशी, गो. बा.

डायरी. १८८८

थोडासाप्रवास. १८९१

माझे प्रवासाची हकीकत. १८९६

रायगडकिल्याचें वर्णन. १८८५

लाहोरचा प्रवास. १८९५

' धनुर्धारी '

हिंदुस्थानचा व्यापारी भूगोल. १८९०

माने लक्ष्मणराव.

काश्मीरवर्णन. १९०३

मानेपाटील, रामचंद्र शामराव.

युरोपच्या प्रवासाचें सिंहावलोकन.

मुजुमदार, दत्तात्रय चिंतामण.

युरोपचा प्रवास. १९१५

राहुरकर, भार्गव गणेश.

डंकपुर महात्म्य.

## चरित्रें.

आपटे, दाजी नागेश.

मिरांबाई. १९२४

इसलामपूर, वामनशास्त्री.

आदिराजचरित्र.

**उपाध्ये, वासुदेव नरहर.**

हरिविक्रमचरित्र.

**केळकर, नरसिंह चिंतामण.**

ग्यारिबाल्डीचें चरित्र.

**गणपतराव व आप्पाजी.**

संतचरित्र. १८९२

**गोत्री, का. न.**

श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांचें चरित्र. १९०५

श्रीमंत संपतराव महाराज गायकवाड यांचें चरित्र.

**घाणेकर, लक्ष्मण गोविंद.**

माझिनी. १८९९

**डोंगरे, शंकर गो.**

बाळंभटदादा देवधर यांचें चरित्र. १९२४

**परांजपे, वि. वि.**

बडोद्याचे राज्यकर्ते. १९०६

**पुणेकर, रावजी विठ्ठल.**

श्री. आहेल्याबाई होळकर यांचें चरित्र. १८७९

**पेंडसे, सीताराम वासुदेव.**

शिवाजी. १९२०

**फाळके, शिवराम गोविंद.**

शिवछत्रपति. १८९३

**बापट, नागेश विनायक.**

श्री. जमनांबाई साहेब गायकवाड यांचें चरित्र.

भागवत, अ. ना.

थोरले सयाजीराव महाराज यांचें चरित्र.

भांबुरकर, रामराम मार्तंड.

अब्राहाम लिंकन. १८९८

मुजुमदार, सखाराम गणेश.

श्री. महाराणी जमनाबाई साहेब गायकवाड यांचें चरित्र.

प्रभुरत्नमाला. १८९६

लिमगांवकर, विनायक सदाशिव.

नरसिंह मेहता यांचें चरित्र. १९०८

भक्तचरित्र. १९१४

लिमये, हरि वामन.

आत्मवृत्तांत.

व्यायामचरित्रसंग्रह. भा. १

# बडोद्याचें मराठी व साहित्य साहित्यभक्त.

## परिशिष्ठ ३

### ग्रंथकार सूचि.

अभ्यंकर
अलोनी, ना. के.
आचार्य,
आठवले, रा. स.
आपटे, दा. ना.
आपट, वा. गो.
आंबेगांवकर, नी. का.
इंदारकर, कृ. रा.
इस्लामपूरकर, वा.
उपाध्याय, व्यं. न.
उपाध्याय, षा. न.
एनापुरे, वि. बा.
ओक, वि. कों,
कदम, ना. रा.
कदम, ह. ल.
कर्वे, वि. धों.
कवठेकर, वि. ल.
काथवटे, ना. आ.
कीर्तिकर, कान्होबा र.
कुडाळकर ज, स.
केळकर, नरहर आ.
केळकर, न. चिं.
केळुस्कर, कृ. अ.
खांडेकर, ना. धों.
खासगीवाले, जो. भा.
गणपतराव आप्पाजी.
गद्रे, ना. कृ.
गांगनाईक, भा. के.
गायकवाड, श्री संपतराव.
गायकवाड, सी. रा.
गुर्जर,
गुणे, जगन्नाथ ग.
गुप्ते, भ. र.
गोखले, नी. ग.
गोखले रा. ह.
गोगटे, कृ. गं.

गोत्री, का. न.

गोळतकर, स. ह.

गोऱ्हे, चं. शि.

ग्रंथसंपादक आणि प्रसारक मं.

घाणेकर, ल. गो.

चांदोरकर,

चापेकर, ग. वि.

चापेकर, श्री. नी.

चिपळूणकर, दा. गो.

चिपळूणकर वि. गो.

छत्रे, आ. मो.

जडे, रा. वि.

जोग वि. रा.

जोगळेकर द. रा.

जोगळेकर, कृ. म.

जोशी, चिं. वि.

जोशी ना. गो.

जोशी, म. मु.

टाकळकर, अ. वा.

डोंगरें, शं. गो.

तट्टू, य. ना.

तांबे, ग. कृ.

तांबे, गो. रा.

दंडवते, ग. र.

दत्तात्रय.

दातार, स. मो.

दाते, वि. स.

दामले, मो. के.

दीक्षित, ग. के.

देव, सी. वि.

देवधर, अ. बा.

देशपांडे, गो. न.

धनुर्धारी.

धुरंधर, कृ. वि.

धोंड, सा. कृ.

नंदुरबारकर, पां रा.

नवलकर, ह. ना.

नाडकर्णी, मं. क.

नातू, वि. र.

नेने, वि. पां.

पंडित, ज. प्र.

पंडित कं. मो.

ग्रंथ संग्रह नं. ता.

पंडित, ना भा.
पंडित, प्र. रा.
पंडित, भा. ना.
परांजपे, के. बा.
परांजपे, गं. बा.
परांजपे, वि. वि.
पवार, बा. वा.
पवार, रा. रा.
पांडे, आ. आ.
पारनाईक, ल. त्रंबक.
पाळेकर, भ. ब.
पावगी, रा. भ.
पुणेकर, के. भ.
पुणेकर रा. वि.
पुराणिक शं वि.
पेंडसे, सी वा.
फडके, सी. म.
फळणीकर,
फाळके, शि. म.
बापट, ना. वि.
बापट, वि. वा.
बापट, स. ग.
बिर्जे, वा. लिं.
बेंजामिन सी.
बेलवल्कर, ह. स.
बोडस, म. रा.
भांगले, धों. ज.
भागवत, अ. ना.
भाटवडेकर, भा. कृ.
भाटवडेकर, वि. कृ.
भांबुरकर, रा. मा.
भोसले बा. के.
मटंगे, ह पु.
मराठे, ग. रा.
मराठे, ब. रा.
मनोहर. शि. स.
महाजनी वि मो.
माणिकराव, ग. य.
माने, लक्ष्मणराव
माने पाटील, रा. शा.
मिरजसंस्थानाधिपति,
मुजुमदार चिं. ना.

मुजुमदार द. चिं.
मुजुमदार, स. ग.
मोडक, बा. प्र.
रांगणेकर, के.
‘ रामतनय ’
राहुकर, भा. ग.
रेशमवाला, पी.
रोकडे, श्री. जनाबाई.
राजवाडे, चिं, वै.
राजे, रा. आ,
लेले, ग. अ.
लिमगांवकर वि. स,
लिमये, ह. वा.
वैद्य, चिं. वि.
वैद्य, वा. रा.
वर्तक, बा. पां.

वसइकर, ग. पी.
विद्वांस, धों. के.
वासुदेवानंदसरस्वती,
वैद्य, ग. भा.
वैद्य, गो. अ.
शास्त्री, अ. ना.
शाह, के. पु.
शिर्के, शि. द.
शिंदे, नानासाहेब.
संत, कृ. रा.
सनाढ्य, तो.
सरदेसाई, गो. स.
सहविचारिणिसभा.
सहस्त्रबुद्धे, ह. मा.
सुरतकर, कृ. य.
सेंट्रललायबरीं.

# बडोद्याचें मराठी साहित्य व साहित्यभक्त.

## परिशिष्ठ २.

## विषयदर्शक सूचि.


| | |
|---|---|
| सर्व साधारण .... .... ... | ९ |
| अध्यात्म व तत्वज्ञान .... .... ... | १० |
| धर्म .... .... .... | २५ |
| नीति .... .... .... | १९ |
| शास्त्र व विज्ञान .... .... | २३ |
| समाजशास्त्रें .... .... | १८ |
| कला व हुन्नर .... .... .... | ४५ |
| गद्यवाङ्मय .... ... .... | २१ |
| काव्यें .... .... .... .... | २० |
| नाटकें ... .. | ५ |
| कादंबऱ्या .... .. | २१ |
| इतिहास .... .. | ३३ |
| भूगोल व स्थलवर्णन .... .... .... | १३ |
| चरित्रें .... .... .... .... | २२ |
| | २८४ |


REFBK-0002885